# पालखी, कावड यात्रेत 'टिम स्पिरिट' जिंकले!



**2500** डाबकी रोडची कावड

**1100** हरिहर पेठची कावड

**500** उमरीची कावड

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

Web. https://epaper.citynewssuperfast.com

RNI No.- MAHMAR/2012/49642 • Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 • वर्ष १६ • अंक ६३ • मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** अकोल्याची ऐतिहासिक श्रावणी कावड यात्रा आणि राजराजेश्वराची पालखी म्हणजे केवळ धार्मिक आणि श्रद्धेचा सोहळा नसून, ते नियोजन, शिस्त आणि 'टिम स्पिरिट'चे (सांघिक कार्य) एक अदभूत उदाहरण ठरले आहे. शनिवारी रात्रीपासून सुरू झालेला हा सोहळा सोमवारी रात्री आणि मंगळवारी पहाटेपर्यंत अत्यंत उत्साहात पार पडला. हजारो शिवभक्तांचा जनसागर रस्ते, गल्ली आणि मंदिरात उसळलेला असतानाही गेल्या ८२ वर्षात ना कुठे चेंगराचेंगरी झाली, ना कसला गोंधळ. अकोल्याच्या या भव्य व्यवस्थापन कौशल्याचे कौतुक सर्वच स्तरांतून होत आहे. यंदा सर्वांनी सांघिकपणे पावसाचे साकडे भगवंताला घातले. राजराजेश्वर मंदिर देखील आज सकाळी नित्यनियमाने स्वच्छ सुंदर होते.

सोमवारी सकाळी कावड व पालखीच्या मार्गावर हजारो भाविकांसाठी शेकडो भव्य मंडप उभे राहिले होते. शनिवारी रात्रीपर्यंत या मार्गावर कुठलेही अडथळे नव्हते, रविवारी रात्रीतून मंडप उभारले गेले. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे सोमवारी पालखी आणि कावड यात्रा पूर्ण होताच, कंत्राटदारांच्या टीमने तातडीने काम सुरू केले. मंगळवारी सकाळी शहरात एकही मंडप, फ्लेक्स किंवा बॅनर शिल्लक नव्हता. कंत्राटदार आणि कामगारांच्या या वेगवान सांघिक कामामुळे शहर अवघ्या काही तासांत पूर्ववत स्वच्छ झाले.






## आरआरसी नेटवर्कचा १७ तासांचा लाईव्ह विक्रम

या संपूर्ण यात्रेचे जगभरातील भाविकांपर्यंत थेट प्रसारण करण्याचे कठीण काम 'आरआरसी नेटवर्क'ने करून दाखवले. आरआरसी समुहाने सलग १७ तास लाईव्ह प्रसारण केले. टीव्ही, युट्यूब, इंस्टाग्राम आणि फेसबुक या सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर हे प्रसारण अविरत सुरू होते.दोन दिवस केबल व इंटरनेट कनेक्शन जोडणे, १० जणांची कॅमेरा टीम, १० जणांची इंटरनेट टीम, तितकीच मोठी संपादकीय टीम आणि आरआरसी स्टुडिओमध्ये येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याचा यथोचित सन्मान सांभाळत हे कार्य पार पडले. कोणत्याही तांत्रिक अडचणीशिवाय झालेले हे थेट प्रसारण केवळ टिम स्पिरिटमुळेच शक्य झाल्याचे आरआरसी समुहाचे कार्यकारी संपादक पंकज देशमुख यांनी सांगितले. 'अकोल्याच्या मातीत कावड व पालखी यात्रेतूनच आम्ही टिम स्पिरिट शिकलो. तेच प्रत्यक्ष आचरणात आणल्यामुळे जगभरातील लाखांवर दर्शकांनी अकोल्याचे हे थेट प्रसारण पाहिले.'

— **पंकज देशमुख,** कार्यकारी संपादक, आरआरसी समूह




## माझ्या टिमला 'सॅल्युट'

गांधीग्राम ते श्री राजराजेश्वर मंदिरादरम्यान निघणाऱ्या ऐतिहासिक कावड यात्रेसाठी अकोला पोलीस प्रशासनाकडून अत्यंत चोख आणि तंत्रज्ञानज्ञानाधारित बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक (एसपी) अर्चित चांडक यांनी आरआरसी न्यूज शी संवाद साधताना पोलीस दलाचे नियोजन आणि उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. कावड यात्रेदरम्यान सुरक्षेचा भाग म्हणून यंदा प्रथमच 'एक कावड मंडळ, एक दत्तक कॉन्स्टेबल' ही संकल्पना राबवण्यात आली. १५० कॉन्स्टेबल ने १५० मंडळ दत्तक देण्यात आले होते. मंडळ जिथून निघाला तिथे परत येई पर्यंत हे कॉन्स्टेबल दोन दिवस त्यांच्या सोबत होते. याशिवाय, गर्दीचे व्यवस्थापन सुरळीत ठेवण्यासाठी 'धक्का पार्टी' जी कावड मंडळाना समोर जाण्यासाठी प्रेरित करत होते. त्या शिवाय डिजिटल वॉच होता. १०० हून अधिक व्हिडिओग्राफर्स, ड्रोन कॅमेरे आणि कमांड कंट्रोल सेंटरमधील २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून थेट पोलिसांचे लक्ष होते. बंदोबस्ताचे नियंत्रण सेक्टर इन्चार्ज म्हणून पोलीस निरीक्षक (पीआय) पाहत होते त्यामुळे त्यांच्या सेक्टरमधून मंडळ बाहेर नेण्याची जबाबदारी त्यांची होती. गुन्हेगारीवर वचक बसवण्यासाठी राबवलेल्या 'वेडनसडे परेड' आणि एआय तंत्रज्ञानावर आधारित 'रो सिस्टीम' या उपक्रमामुळे जिल्ह्यातील गुन्ह्यांमध्ये ५८ टक्क्यांनी घट झाली आहे. या सर्वोत्कृष्ट आयटी प्रोजेक्टसाठी एनसीआरबी कडून अकोला पोलिसांचा गौरवही करण्यात आला आहे. असा तंत्रज्ञानाच्या आधार नियमित पोलिसींगच्या माध्यमातून यशस्वी बंदोबस्तात अकोला पोलिस दलाचा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या टिम वर्क ला टिम स्पिरिटला सॅल्युट असल्याचे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक म्हणाले. तसेच, आपत्कालीन सेवेसाठी असलेल्या 'डायल ११२' च्या रिस्पॉन्स टाइममध्ये पहिल्या सहा महिन्यांत अकोला पोलीस राज्यात प्रथम क्रमांकावर राहिले आहेत. कावड भक्तांच्या शिस्तप्रियतेचे कौतुक करत एसपी अर्चित चांडक यांनी अकोला पोलीस जनतेच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असल्याचे स्पष्ट केले.

कावड यात्रेच्या काळात लाखोंच्या गर्दीचे नियंत्रण करणे हे मोठे आव्हान असते. जिल्हा पोलीस अधीक्षक (एसपी) अर्चित चांडक यांच्या नेतृत्वाखाली अकोला पोलीस दलाने हे आव्हान टिम स्पिरिटच्या जोरावर पेलले. दोन दिवसांचा हा बंदोबस्त शनिवारपासून ते सोमवारच्या मध्यरात्रीपर्यंत होता. गर्दीचे नियंत्रण करताना भाविकांना कुठलाही त्रास होणार नाही आणि वाहतूक कोंडी टळेल, या धोरणाने पोलिसांनी बजावलेली कर्तव्यनिष्ठा ही कौतुकास्पद ठरली. संपुर्ण देशात अशा प्रकारचा कावड उत्सव कुठे ही नाही त्यामुळे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या नेतृत्वात अतिशय शिस्तबध्द कावड बंदोबस्ताचे कौतुक होत आहे.

## खांद्याला खांदा लावून २० किमीची प्रवास

साधा अर्धा किलोमीटर जरी सोमवारी चालतले तर डोक्यावर तापणारे उन, चटका लावणारा सुर्य प्रकाश, अंगातून घामाच्या वाहणाऱ्या धारा प्रत्येकजण अनुभव होते. पण, गांधीग्रामच्या पूर्णा नदीवरून पवित्र जल आणण्यासाठी शेकडो तरुणांचे गट शनिवारी रात्रीपासूनच सज्ज झाले होते. खांद्यावर भरलेली कावड आणि दोन्ही बाजूंना शेकडो लिटर पाण्याचे वजन घेऊन तब्बल २० किलोमीटर येणे हा निव्वळ शारीरिक क्षमतेचा भाग नाही, तर ते उत्तम टिम स्पिरिटचे उदाहरण होते. प्रत्येक कावडधारी तरुण थकल्यावर दुसरा सहकारी क्षणाचाही विलंब न लावता कावड खांद्यावर घेतो. राजराजेश्वरावर शेकडो घागरींचे जल अर्पण करेपर्यंत ही साखळी एका शिस्तबद्ध लयीत सुरू असते. केवळ एका मंडळाने कावड / पालखी आणली नाही तर तब्बल दोनशे मंडळ सहभागी होते. हजारो वैयक्तिक कावडधारी हे खांद्यावर कावड आणून ग्रामदैवत भगवान राजेश्वरसमोर नतमस्तक झाले. मंदिर परिक्रमा करताना राजराजेश्वराची भरभक्कम पालखी उचलताना खांद्यावर पडणारा प्रचंड भार कसा सांभाळायचा, गर्दीत तोल कसा सावरत पुढे जायचे, याचे धडे कोणत्याही व्यवस्थापन संस्थेत दिले गेले नाहीत. हे ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपोआप वळते झाले. विशेष म्हणजे, सोमवारी दिवसभर अहोरात्र कावड यात्रेत घाम गाळणारा तरुण आज मंगळवारी सकाळी नित्यनियमाने स्वतःच्या ड्युटीवर हजर होता, हा अकोलेकरांच्या टिम स्पिरिट व शिस्तबद्धतेचा सर्वोच्च नमुना मानला जात आहे.

# न्यामूर्ती बी.वी. नागरत्ना होणार भारताच्या पहिल्या महिला सरन्यायाधीश!

वृत्तसंस्था ८ सप्टेंबर

**दिल्ली :** भारतात सुप्रीम कोर्टात सरन्यायाधीश पद अद्याप कोणत्याही महिलेने भूषवलेले नाही. आता लवकरच भारताची ७५ वर्षांची प्रतीक्षा संपुष्टात येणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीश म्हणून बी.वी. नागरत्ना यांची नियुक्ती होण्याची शक्यता आहे. ज्येष्ठता क्रमानुसार विक्रम नाथ यांच्यानंतर आता



न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना यांची नियुक्ती होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बी. व्ही. नागरत्ना यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९६२ रोजी बंगळुरूमध्ये झाला. त्यांनी के जीसस अँड मेरी कॉलेजमध्ये बीएचे शिक्षण पूर्ण केलं. पुढे १९८७ साली दिल्ली विद्यापीठातून एलएलबीचे शिक्षण पूर्ण केलं. त्यांनी १९८७ साली वकिली सुरू केली. न्यायमूर्ती नागरत्ना यांचे वडील ई.एस. व्यंकटरमैया हे सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश होऊन गेले आहेत. न्या. नागरत्ना यांनी सरन्यायाधीश पद भूषवल्यास, त्या अशा व्यक्ती ठरतील, ज्यांचे वडील आणि स्वत: दोघांनी सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश पद भूषवल्याचा इतिहास होईल.

# सरकारचे शिष्टमंडळ आता जरांगे पाटलांकडे जाणार नाही!

## १२ सप्टेंबरच्या अल्टिमेटमवर मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांची भूमिका

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा तापले असताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी १२ सप्टेंबरपासून मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मात्र, सरकारने आतापर्यंत आवश्यक ते निर्णय घेतले असून अनेक मागण्यांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे आता जरांगे पाटील यांनी सरकारच्या भूमिकेला प्रतिसाद देत आंदोलन स्थगित करण्याचा विचार करावा, असे विखे पाटील यांनी म्हटले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना विखे पाटील यांनी मराठा आरक्षणासंदर्भातील निर्णय, ५८ लाख नोंदींचा मुद्दा, कुणबी प्रमाणपत्रांसाठी सुरू असलेली प्रक्रिया आणि सरकारच्या पुढाकाराची माहिती दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजासाठी यापूर्वीच्या सरकारांच्या तुलनेत मोठे निर्णय घेतल्याचा दावा त्यांनी केला.

मराठा आरक्षणाच्या मागण्यांसंदर्भात झालेल्या बैठकीत सध्याच्या परिस्थितीचा आणि घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आल्याचे राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. मनोज जरांगे पाटील अद्याप आंदोलन मागे घेण्यास तयार नसल्याचे लक्षात आणून दिल्यावर विखे पाटील म्हणाले की, सरकारने मराठा समाजाच्या व्यापक हितासाठी आवश्यक ते निर्णय घेतले आहेत. या निर्णयांची अंमलबजावणीही सुरू आहे. जरांगे पाटील यांचे आणखी काही प्रश्न किंवा अपेक्षा असतील तर त्यावरही सरकारकडून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, सरकारच्या निर्णयांनंतरही जरांगे पाटील समाधानी नसतील, तर त्यांचे समाधान करण्यासाठी सरकारकडे यापेक्षा वेगळा कोणता पर्याय उपलब्ध आहे.

# काटेपूर्णा प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी राखीव



## सिंचनाचे मोटारपंप तत्काळ बंद करणार

» जलाशय अथवा नदीवर सिंचनासाठी सुरू असलेले मोटारपंप पत्र मिळताच तत्काळ बंद करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, आदेशानंतरही पंप सुरू ठेवण्यात आल्यास संबंधित मोटारपंप जप्त करण्यात येईल, तसेच संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा थेट इशारा जलसंपदा विभागाने दिला आहे.

" जलसाठा जपण्याला प्राधान्य यंदा कमी पावसामुळे खरीप हंगामासह पाणी उपलब्धतेचेही गणित बिघडले आहे. काटेपूर्णा प्रकल्पावर अकोला शहरासह परिसरातील पाणीपुरवठ्याचा मोठा भार आहे. त्यामुळे उर्वरित जलसाठा जपण्याला प्रशासनाने प्राधान्य दिले आहे.
**संदीप नेमाडे,** शाखा अभियंता महान.

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** यंदा पावसाने ओढ दिल्याने काटेपूर्णा प्रकल्पातील जलसाठा चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. त्यातच उष्णतेची लाट कायम असल्याने उपलब्ध पाणीसाठ्यात आणखी घट होण्याची शक्यता आहे. या पृष्ठभूमीवर काटेपूर्णा धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याच्या दृष्टीने सिंचनासाठी पाण्याचा उपसा करणारे सर्व मोटारपंप तत्काळ बंद ठेवण्याचे आदेश जलसंपदा विभागाने दिले आहेत.

काटेपूर्णा धरण व्यवस्थापन शाखेचे शाखा अभियंता यांनी संबंधितांना पत्राद्वारे हे आदेश बजावले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार काटेपूर्णा प्रकल्पातील पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रकल्पातील सद्य जलसाठ्याची स्थिती लक्षात घेता सिंचनासाठी जलसाठा जपण्याला प्राधान्य दिले.

# शिक्षकांचे वेतन दरमहा 1 ते 5 तारखेपर्यंत अदा करा; अन्यथा कडक कारवाई!

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

## मनीष गावंडे यांच्या मागणीला प्रतिसाद



**अकोला:** जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन दरमहा ५ तारखेनंतर होत असल्याने कर्मचाऱ्यांना विविध आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. या गंभीर प्रश्नावर महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनीष गावंडे यांनी पुढाकार घेत प्राथमिक शिक्षण विभागाकडे दाद मागितली. त्यांच्या या पाठपुराव्याची तातडीने दखल घेत जिल्हा परिषद अकोलाचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. रतनसिंग पवार यांनी वेतन वेळेत न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर व अधिकाऱ्यांवर थेट प्रशासकीय कारवाईचा इशारा देणारे परिपत्रक जारी केले आहे.

### मनीष गावंडे यांनी मांडली शिक्षकांची व्यथा

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मनीष गावंडे यांनी ७ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षणाधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केले होते की, दरमहा वेतन ५ तारखेनंतर उशिरा मिळत असल्यामुळे शिक्षकांचे गृहकर्ज, वैयक्तिक कर्जाचे हप्ते तसेच विम्याचे हप्ते वेळेत भरले जात नाहीत. यामुळे बँकांकडून दंडात्मक शुल्क व अतिरिक्त व्याज आकारले जाऊन शिक्षकांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. शासनाचे विविध परिपत्रक व शालार्थ प्रणाली अस्तित्वात असतानाही वेतनात विलंब का व्हावा? असा प्रश्न उपस्थित करत दरमहा १ ते ५ तारखेदरम्यान वेतन जमा करण्याचे निर्देश द्यावेत, अशी आग्रही मागणी मनीष गावंडे यांनी निवेदनाद्वारे केली होती.

शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांनी मनीष गावंडे यांच्या पत्राची गांभीर्याने दखल घेत आदेश दिले.

प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला वेतन प्रदानाची स्थिती दर्शवणारा अहवाल सादर करावा. वेतन १ ते ५ तारखेदरम्यान जमा न झाल्यास जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे निश्चित करून सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

वेतन प्रक्रियेत निष्काळजीपणा किंवा विनाकारण फाईल प्रलंबित ठेवल्यास संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कोणतीही पूर्वसूचना न देता शिस्तभंगविषयक कडक प्रशासकीय कारवाई केली जाईल.

शिक्षण विभागाने मनीष गावंडे आणि संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसिंग पवार यांच्या सकारात्मक व धोरणात्मक निर्णयाबद्दल त्यांचे मनापासून आभार व्यक्त केले आहेत.

# भारत कृषक समाज वृक्षारोपण मोहिमेचा पुण्यात समारोप

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला:** ग्लोबल वार्मीगचा परिणाम आपल्या सर्वाना भोगावा लागत आहे उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या तिन्ही ऋतुची अनियमितता हा त्याचाच परिणाम आहे. त्या करिता मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून त्याचे जतन करणे गावोगावी छोटया मोठ्या नदीनाल्यांचे खोलीकरण, पाणी अडवून जिरविणे, पुरामुळे वाया जाणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन करणे वगैरे असे नैसर्गिक उपाययोजनाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची गरज आहे. त्यामुळे भारत कृषक समाज महाराष्ट्र तर्फे दरवर्षी राबविल्या जाणाऱ्या वृक्ष लागवडीचा उपक्रम त्याचाच एक भाग आहे. या वर्षी १ ऑगष्ट पासून चंद्रपूर येथून सुरू केलेल्या वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाची सांगता नुकतीच पुणे येथे कृषि महाविद्यालयाच्या



प्रांगणात महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांचे हस्ते आंब्याचे रोपं लावून झाली.

त्यावेळी डॉ. प्रकाश मानकर, डॉ. रमेश ठाकरे, नागपुर युनिव्हरसिटीचे माजी कुलगुरू डॉ. पठाण, प्राचार्य भालेकर, रमेश नाकट, अविनाश गवई, पी. टी. शुक्ला, हिरामण गवई तसेच विविध जिल्हयातील अ‍ॅड. चंद्रकांत फोकमारे, शेषराव पाटील, रामेश्वर माळी, डॉ. सुधीश पाटील, रविन्द्र देशमुख, राजेन्द्र देशमुख, अजय भोगरे, यश देशमुख, निशांत घाटे, डॉ. किरण ठाकरे, प्रा. प्रफुल्ल डोंगरे, प्रा. प्रियंका गवलानी, नेहा ठाकूर, अश्विनी आगरकर, कल्पना चांदूरकर, माधव भारसाकळे, ईत्यादी बरेच कार्यकर्ते उपस्थीत होते.

# प्रारूप यादीत समावेश नसलेल्या मतदारांच्या याद्या प्रसिद्ध, संबंधितांनी नोंद घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला:** प्रारुप मतदार यादीमध्ये समाविष्ट करता आली नाहीत अशा (अनकलेक्टेबल ईएफ) गटातील मतदारांच्या नावांच्या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या असून, संबंधितांनी नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भारत निवडणूक आयोगाने दि.०१.१०.२०२६ या अर्हता दिनांकावर आधारीत घोषित केलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणचा (SIR) घोषीत केलेल्या कार्यमातील सुधारीत वेळा पत्रकानुसार प्रारुप यादीची प्रसिध्दी दिनांक ३१ ऑगस्ट रोजी करण्यात आलेली आहे.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचा कार्यक्रमाअंतर्गत घरोघरी जाऊन गणना प्रपत्र भरुन घेण्याचा कार्यक्रम दिनांक ३० जून ते दिनांक १७ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात आला. या कालावधीत अकोला जिल्हयातील गणना प्रपत्रे भरून परत न देणा-या *२ लक्ष ७६ हजार ९९२* इतके मतदार “गणना प्रपत्र जमा न होणे (Uncollectable EF)” या प्रवर्गात नोंदविण्यात आलेले आहेत. त्या मतदारांची नावे ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आलेले नाहीत.

यामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याने प्रत्यक्ष गृहभेट दिल्यानंतर सापडु न शकलेले /गैरहजर (Absent), कायमस्वरुपी स्थलांतरीत (Permanently Shifted), मृत (Dead), अन्यत्र नोंदणी केलेले (Already Enrolled) व इतर (Other) या गटातील मतदारांचा समावेश आहे.

त्यानुसार जिल्ह्यात आढळून न आलेले/गैरहजर ५१ हजार २६, कायमस्वरुपी स्थलांतरीत १ लक्ष ३४ हजार ५८९, मृत ४६ हजार २४७, अन्यत्र नोंदणी असलेले किंवा दुबार ४४ हजार ४४८, इतर ६८२ असे दोन लक्ष ७६ हजार ९९२ व्यक्ती आहेत.

ज्यांची नावे प्रारुप मतदार यादी मध्ये समाविष्ट करता आली नाहीत अशा (अनकलेक्टेबल ईएफ) गटातील मतदारांच्या नावांच्या याद्या उपजिल्हाधिकारी (महसुल) तथा मतदान नोंदणी अधिकारी, सर्व उप विभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी, सर्व तहसिलदार तथा सहायक नोंदणी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला.

सर्व पंचायत समिती, महानगरपालिका अकोला. सर्व नगर परिषद, नगर पंचायत या कार्यालयाचे सूचना फलकावर तसेच अकोला जिल्ह्याचे www.akola.gov.in या शासकीय संकेतस्थळावर विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) या टॅब वर अवलोकनास उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याबाबत सर्वांनी नोंद घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

# `जिल्ह्यात 22 संस्था अंतिम अवसायनात`

## अवसायकांची २२ सप्टेंबरला सभा

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला:** अकोला तालुक्यातील २२ सहकारी संस्था अंतिम अवसायनातील संस्थांच्या अवसायकांची सभा दि. २२ सप्टेंबर सकाळी ११ वा. सहकारी संस्था उपनिबंधकांच्या कार्यालयात होईल.

संस्थांमध्ये अकोला मेन हॉस्पिटल कर्मचारी पतसंस्था, जनता होलसेल अँड कन्झुमर्स कर्मचारी सह. पतसंस्था, कामगार राज्य विमा दवाखाना कर्म. सह. पतसंस्था, प्रभात कर्मचारी सह. पतसंस्था, एमआयएल कर्मचारी सहकारी पतसंस्था, नवभारत कन्झ्युमर्स सोसायटी, एमएसईबी वर्कर्स हाऊसिंग सोसा., अकोलारत्न गृहतारण संस्था, विठ्ठल गृहतारण सह. संस्था, सौरभ गाळेधारक गृहनि. संस्था, संत गाडगेबाबा म्हाडा गृहनि. सह. संस्था, संत संताजी गृहनि. सह. संस्था, राधिका गृहतारण सह संस्था, गुरूकृपा गृहनि. सह. संस्था, सहकार खाते शासकीय गृहनि. सह. संस्था, सहकार रत्न गृहतारण सह. संस्था, अकोला प्रवासी व मालवाहतूक सह. संस्था, वसुंधरा सुशिक्षित बेरोजगार सेवा सह. संस्था, लोकसेवक सु. बे. सेवा सह. संस्था, निर्मल नंदा सु. बे. सेवा संस्था, श्री राजराजेश्वर स्वयंरोजगार नागरिक सेवा सह. संस्था, कॉटनसिटी क्रेडिट को-ऑप सोसायटी आदी संस्थांचा समावेश आहे.

संबंधितांनी दि. २२ सप्टेंबरला सकाळी ११ वा. उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका अकोला, जिल्हा सहकारी भूविकास बँक, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, अकोला येथे उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बाल हक्क संरक्षण आयोग उद्या अकोल्यात

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा ९ सप्टेंबर रोजी अकोला जिल्हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यात जिल्ह्यातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण, बाल संरक्षण व्यवस्थेची अंमलबजावणी तसेच बालगृहांमधील बालकांच्या परिस्थितीचा आढावा घेतला जाणार आहे.

दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात बालविकास भवन येथे सकाळी १० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत बालकांशी संबंधित प्रकरणांची सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. यावेळी बालकांच्या हक्कांशी संबंधित विविध प्रकरणांवर सुनावणी होणार आहे.

यानंतर दुपारी १२.३० ते २ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात अकोला जिल्ह्यातील बाल संरक्षण विषयक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत जिल्ह्यातील बाल संरक्षण व्यवस्थेची सद्यस्थिती, बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि संबंधित यंत्रणांकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा आढावा घेतला जाणार आहे.

# स्वाधार योजनेच्या अर्जाची त्रुटी पूर्ततेसाठी 10 सप्टेंबरपर्यंत मुदत

**अकोला;** शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती तथा नवबौध्द घटकातील इयत्ता 11 वी 12 वी तसेच इयत्ता 12 वी नंतरच्या व्यवसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याकरिता शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केली आहे.

## निधन वार्ता

### अनंतराव बगाडे

**अकोला :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव बगाडे,



७२ यांचे पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि मोठा आप्त परिवार आहे. जिल्ह्यात पक्षाला बळकटी देण्यात त्यांचे योगदान होते. बुधवारी सकाळी १० वाजता खेडकर नगर मधील त्यांच्या निवासस्थानाहून अंत्ययात्रा निघणार आहे.


## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वाशिम यांचे कार्यालय

सिव्हील लाईन वाशिम ता.जि. वाशिम ४४४५०५

Email id:- tahsildarwashim1@gmail.com Phone: 07252-232008

रा.मा.क्र.आर.टी.एस-५९/ हिस्से बोराळा / /२०२५-२६

### जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **अर्जदार अर्जदार अनुसया ज. बळीराम रा. येवती ता. रिसोड जि. वाशिम, सरस्वतीबाई ज. आत्माराम रा. सोनखास ता.जि. वाशिम व गिताबाई ज. रामचंद्र रा. मेहकर ता. मेहकर जि. बुलढाणा** यांनी संदर्भीय अर्ज या कार्यालयात सादर केला असून त्यांनी त्यांचे अर्जामध्ये नमुद केले आहे की, मौजे हिस्से **बोराळा** ता.जि. वाशिम येथील स.नं. 186, 176, 29, 23 मधील क्षेत्र मुळ मालक आयाजी सटवाजी यांचे नांवे जमिन होती सदर व्यक्ती हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस हे भोगवटादार या नकाऱ्यात येणे आवश्यक होते. परंतु तसे न होता सदरचे वारसांची नोंद ही इतर अधिकार या रकाऱ्यात करण्यात आलेली आहे. तेव्हा इतर अधिकार या नकाऱ्यातील सर्व वारस हे भोगवटादार या नकाऱ्यात घेण्यात याये या बाबत तलाठी यांना आदेश देण्यात यावे बाबत अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

तेव्हा अर्जदार यांचे अर्जानुसार मौजे **हिस्से बोराळा** ता.जि. वाशिम येथील त्यांचे ताब्यातील व वहीतीमधील गट नं 186, 176, 29, 23 मधील **क्षेत्र मुळ मालक आयाजी सटवाजी यांचे** नांवे जमिन होती सदर व्यक्ती हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस हे भोगवटादार या नकाऱ्यात येणे आवश्यक होते परंतु तसे न होता सदरचे वारसांची नोंद ही इतर अधिकार या रकाऱ्यात करण्यात आलेली आहे. तेव्हा इतर अधिकार या नकाऱ्यातील सर्व वारस हे भोगवटादार या नकाऱ्यात घेण्यात यावे असे दुरूस्ती करण्यास हरकत व आक्षेप असल्यास सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून 15 दिवसाचे आत त्यांनी लेखी या कार्यालयात कळवावे. मुदतीनंतर प्राप्त आक्षेप/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक :- 25/05/2026**
**ठिकाण :- वाशिम**

( निलेश पळसकर )
तहसिलदार वाशिम


# 'ग्रीन वसुधा'च्या माध्यमातून शिक्षकांनी दिली अकोल्याला हिरवाईची नवी दिशा

## ३९ शाळांचा सहभाग ; ८,०४७ विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग, ८,२६० रोपांचे वितरण







प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** 'आजची हिरवाई, उद्याच्या अकोल्याचे भविष्य' हा संदेश देत 'ग्रीन वसुधा' उपक्रमाच्या माध्यमातून अकोला शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. या पर्यावरणपूरक उपक्रमात तब्बल ३९ शाळांमधील ८,०४७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तर 'ग्रीन वसुधा' टीमच्या वतीने ८,२६० रोपांचे वितरण करण्यात आले. हजारो विद्यार्थ्यांच्या हातात पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी सोपविणाऱ्या या उपक्रमामुळे अकोल्याला अधिक हिरवे, सुंदर आणि शाश्वत बनविण्याच्या सामूहिक प्रयत्नांना नवी दिशा मिळाली आहे. 'ग्रीन वसुधा' हा केवळ वृक्षलागवडीचा कार्यक्रम न राहता, विद्यार्थ्यांना निसर्गाशी जोडणारी आणि त्यांच्या मनात पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविणारी लोकचळवळ ठरत आहे. या उपक्रमात रोपांचे सुरळीत वितरण, योग्य ठिकाणी लागवडीसाठी मार्गदर्शन, रोपांच्या संवर्धनाची पद्धत समजावून सांगणे तसेच जिओ-टॅग केलेले फोटो व आवश्यक माहिती वेळेत संकलित करून देण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांनी अत्यंत निष्ठेने पार पाडली.

विविध संस्थांचे मोलाचे सहकार्य हा व्यापक उपक्रम यशस्वी करण्यासाठी JCI Akola City, PSV's Nurtury आणि Association of Regional Oil Millers, Akola (AROMA) यांच्या संपूर्ण टीमने मोलाचे सहकार्य केले. रोपांची उपलब्धता आणि वितरण सुरळीत होण्यासाठी वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचेही विशेष सहकार्य लाभले. यामध्ये उपवनसंरक्षक सुमित सोळंके, सहाय्यक उपवनसंरक्षक नम्रता ताले, वनपरिक्षेत्र अधिकारी बी. डी. कटारिया, वनपाल रामेश्वर ससाणे, वनरक्षक एन. ए. सावळे, मजूर सागर पल्लाडे, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय अधिकारी रोहित चौबे, वनरक्षक एन. एम. मोरे, विवरा येथील विजय राठोड, डेटा एंट्री ऑपरेटर राहुल डावंडे तसेच मूर्तिजापूरच्या वनपरिक्षेत्र अधिकारी डेहनकर मॅडम यांचे सहकार्य लाभले.

शिक्षक ठरले चळवळीचे आधारस्तंभ "केवळ धडे शिकवणारे नव्हे, तर जीवनाला दिशा देणारे आणि भविष्यासाठी हिरवी आशा निर्माण करणारे सर्व शिक्षक हेच 'ग्रीन वसुधा' चळवळीचे खरे आधारस्तंभ आहेत," असा संदेश 'ग्रीन वसुधा' टीमतर्फे देण्यात आला. या उपक्रमात न्यू ईरा हायस्कूलच्या प्रगती आळे, दिव्या नारायणा स्कूलच्या दिव्या नारायणा, स्कूल ऑफ स्कॉलर्सचे संकेत टेकाडे, डॉ. इकबाल उर्दू प्रायमरी अँड मिडल स्कूलच्या येहरार खान, जुबली इंग्लिश हायस्कूल कुंभारीच्या स्मृती पारसकर, जुबली इंग्लिश हायस्कूल अकोलाच्या मनीषा नाईक, जी. एस. कॉन्व्हेंट/एस. एमटी. एल. डी. पटेल हायस्कूलचे तेजस वोहरा, लेट. ज्योती जानोरकर विद्यालयाच्या मयुरी बिजवार, बाल शिवाजी हायस्कूलच्या अंजली देशमुख, खंडेलवाल ज्ञान मंदिर विद्यालयाच्या वैशाली पांडे, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे दिनेश चव्हाण, निशू नर्सरी अँड कोठारी कॉन्व्हेंटच्या दीपमाला खंडेलवाल व अंजली धोटकर, माउंट कार्मेल स्कूलच्या कसर अली व बीबी फातिमा शेख, माउंट कार्मेल इंटरनॅशनलच्या बिंदिया अडाणी, प्रभात किड्स स्कूलच्या पूनम दुबे, आर. डी. जी. पब्लिक स्कूलच्या श्रद्धा गिरी व जय वाटणे, होली क्रॉस कॉन्व्हेंट हायस्कूलचे प्रज्योत गावंडे, जय बजरंग हायस्कूलचे बबलू तायडे, मुंगीलाल बाजोरिया हायस्कूलच्या कल्याणी खुमकर, भिकमचंद खंडेलवाल विद्यालयाचे निलेश देशपांडे व प्रभुदास बावणे, मोहरी देवी खंडेलवाल कन्या विद्यालयाचे प्रदीप चौखंडे, फर्स्ट क्राय प्री-प्रायमरीच्या रोमा उत्तमचंदाणी, लर्निंग ट्री स्कूलच्या स्नेहा चावला, लिटिल मिलेनियम स्कूलचे मोहित अग्रवाल व प्रीती सचिन माटोडे तसेच श्री वेंकटेश बालाजी इंग्लिश स्कूल, मूर्तिजापूर आदी शाळांमधील शिक्षकांनी वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमात विशेष योगदान दिले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश घराघरांत पोहोचवत 'ग्रीन वसुधा'ने भविष्यातील अकोल्यासाठी हिरवाईची मजबूत पायाभरणी केली आहे. वृक्षलागवडीसोबतच लावलेल्या रोपांचे संगोपन करण्याची जबाबदारीही विद्यार्थ्यांनी स्वीकारल्याने या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाची संस्कृती पुढील पिढीत रुजण्यास मदत होणार आहे.


## ADMISSION NOTICE (2026-27)

MAHILA UTKARSHA PRATISHTHAN'S

## COLLEGE OF PHARMACY (B.PHARM)

Approved by PCI New Delhi, DTE, Govt. of Maharastra Mumbai & Affilliated to S.G.B.A.U. Amravati

### DIRECT SECOND YEAR B. PHARMACY

### AGAINST CAP SEAT

Application are invited from eligible candidates for admission to DIRECT SECOND YEAR PHARMACY IN Academic year 2026-27 to fill & Against Cap Vancancies.

### SCHEDULE ACTIVITIES FOR DIRECT SECOND YEAR PHARMACY

| SR.NO. | ACTIVITIES | SCHEDULE |
|---|---|---|
| 01 | Invitation of Application Along With Necessary Documents | 09-09-2026 to 09-09-2026 |
| 02 | Display of Provisional Merit List | 10/09/2026 (11:00 am) |
| 03 | Submision of Gravience if any | 10/09/2026 (02:00 pm) |
| 04 | Display of Final Merit List | 11/09/2026 (05:00 pm) |
| 05 | Reporting for admision | 12/09/2026 to 15/09/2026 |

(i) The candidate should eb an Indian National; (ii) Passed Diploma Coures in Pharmacy with at least 45% marks (at least 40% marks in case of candidates of Backward class categories, Economically & Weaker Section and Persons with disability belonging to Maharashtra State only) from an All India Council for Technical Education or Pharmacy Council of India or Central of State Government approved Institution or its equlvalent.

**Principal**

FOR DETAILS CONTACT

COLLEGE OF PHARMACY, B.PHARM
PUNDLIK NAGAR DEGAON RISOD DIST. WASHIM
Mobile Number:- 8329912938, 9552312130, 9921165689
Email Id:- bpharmprincipal@gmail.com

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आदिवासी पदभरतीचा मार्ग मोकळा

## मंत्री अशोक उईके यांच्या मध्यस्थी; १५ सप्टेंबरला मुख्य सचिवासोबत बैठक

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**यवतमाळ :** अनुसूचित जमाती प्रवर्गाची विशेष पदभरती तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हा परिषदेसमोर सुरू असलेले आदिवासी विद्यार्थी व बेरोजगार युवकांचे बेमुदत आंदोलन अखेर स्थगित करण्यात आले. आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या मध्यस्थीने आंदोलकांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण, ग्रामविकास, आरोग्य यांसह विविध विभागांमध्ये तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, वन विभाग आदी ठिकाणी पेसा व बिगरपेसा क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गाची पदे भरण्याची मागणी आंदोलकांनी केली होती. या मागणीची शासनाने




दखल घेतली असून, पदभरतीच्या प्रश्नावर मंत्री उईके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेतली होती. या बैठकीत अनुसूचित जमाती प्रवर्गाची पदभरती सहा महिन्यांत पूर्ण करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते.

यानंतर सोमवारी (दि. ७) जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, आमदार राजू तोडसाम, जिल्हाधिकारी विकास मीना, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी आणि आंदोलनकर्ते विद्यार्थी व युवक यांची बैठक झाली. या बैठकीत आंदोलकांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हा परिषदेतील विविध विभागांमधील अनुसूचित जमाती प्रवर्गाची पदे, रिक्त पदे, समायोजित पदे, बिंदुनामावली तसेच सेवा प्रवेश नियमांबाबत आंदोलकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी १५ सप्टेंबर रोजी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांच्या सचिवांची बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच संबंधित विभागांकडील पदभरतीची संपूर्ण माहिती आंदोलनकर्त्यांना उपलब्ध करून देण्याचे निर्देश मंत्री उईके यांनी विभागप्रमुखांना दिले.

बैठकीनंतर झालेल्या सकारात्मक चर्चेच्या पार्श्वभूमीवर आंदोलक विद्यार्थी व बेरोजगार युवकांनी बेमुदत आंदोलन स्थगित करण्याची घोषणा केली. त्यानंतर मंत्री उईके यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधला.

या बैठकीला सहायक जिल्हाधिकारी रेवैयाह डोंगरे, उपवनसंरक्षक नवनीत मिश्रा, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## आरोग्य शिबिरात ५०० रुग्णांची तपासणी

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**आर्णी :** शहरातील डॉ. फैजान खान व डॉ. निलोफर खान यांच्या हफसाह क्लिनिकचे शास्त्रीनगर येथील खानका मस्जिदजवळ नव्या ठिकाणी स्थलांतर करण्यात आले. यानिमित्त रविवारी (ता. ६) क्लिनिकच्या वतीने भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात सुमारे ५०० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

शिबिरात आलेल्या रुग्णांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यासोबतच रक्तदाब व रक्तशर्करेची तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांची आवश्यकतेनुसार रक्त तपासणीही मोफत करण्यात आली. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

गरजू नागरिकांना योग्य व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, हा शिबिराचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. यापुढेही नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करणे, योग्य आरोग्यविषयक मार्गदर्शन देणे तसेच प्रत्येक रुग्णाला उत्तम आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे डॉ. निलोफर खान व डॉ. फैजान खान यांनी सांगितले.

या शिबिराला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकारांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

# उमरखेड सोसायटी गटात तिरंगी लढतीचे संकेत

## जिल्हा बँक निवडणुकीत दिग्गजांच्या प्रतिष्ठेची परीक्षा

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

### २७ मतांचा जादुई आकडा

■ दुहेरी लढत झाल्यास ५२ पैकी किमान २७ मतांचा जादुई आकडा गाठणे विजयासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. मात्र तिरंगी लढत झाल्यास प्रत्येक मताची किंमत वाढणार असून, मतदारांच्या भूमिकेला कमालीचे महत्त्व प्राप्त होईल. त्यामुळे संभाव्य घोडेबाजाराच्या चर्चांनाही उधाण आले आहे. अविरोध निवडणुकीची शक्यता कमी होत असल्याने मतदार प्रतिनिधींचे 'अच्छे दिन' येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यामुळे अवघ्या ५२ मतदारांचा उमरखेड सोसायटी गट आगामी जिल्हा बँक निवडणुकीतील 'हॉट सीट' ठरण्याची चिन्हे आहेत.

**उमरखेड :** यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून, उमरखेड तालुका सोसायटी मतदारसंघातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. अवघे ५२ मतदार असलेल्या या मतदारसंघात यंदा तिरंगी लढतीचे संकेत मिळत असून, दिग्गजांच्या प्रतिष्ठेची परीक्षा होण्याची शक्यता आहे. संभाव्य उमेदवारांकडून मतदारांच्या गाठीभेटी आणि जुळवाजुळव सुरू झाल्याने या छोट्याशा मतदारसंघाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**५२ मतदारांवर विजयाचे गणित**

या मतदारसंघातून भाजपचे प्रकाश पाटील देवसरकर, डॉ. अंकुश देवसरकर आणि काँग्रेसचे माजी अर्थ व बांधकाम सभापती राम देवसरकर हे इच्छुक असल्याची चर्चा आहे. त्यामुळे एकाच मतदारसंघात तीन प्रभावी चेहरे आमनेसामने येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे प्रकाश पाटील देवसरकर हे १९९७ पासून बँकेच्या संचालकपदावर राहिले आहेत. डॉ. अंकुश देवसरकर यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे समीकरणांना नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

काँग्रेसचे माजी आमदार ॲड. अनंतराव देवसरकर यांचे पुत्र राम देवसरकर यांच्या संभाव्य प्रवेशामुळे या लढतीला आणखी राजकीय रंग चढला आहे. तिन्ही इच्छुकांनी आपापल्या समर्थकांची जुळवाजुळव सुरू केली असून, कोण किती मतदारांना आपल्या बाजूने वळवतो, यावर विजयाचे गणित अवलंबून राहणार आहे.

**नव्या प्रतिनिधींवर भिस्त**

ही निवडणूक तब्बल दहा वर्षांनंतर होत असल्याने मतदारसंघातील परिस्थितीतही मोठा बदल झाला आहे. अनेक सहकारी संस्थांमध्ये बँक प्रतिनिधी म्हणून नवीन चेहरे पुढे आले आहेत. त्यामुळे जुन्या राजकीय समीकरणांपेक्षा नवीन मतदार प्रतिनिधींची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

**दिग्गजांनी भूषविले संचालकपद :** उमरखेड सोसायटी गटातून यापूर्वी मामासाहेब शिलार, माजी आमदार ॲड. अनंतराव देवसरकर, देवराव पाटील काळे आणि माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदाची धुरा सांभाळली आहे. जिल्हा गटातून पंजाबराव माने, द. ली. सूर्यवंशी आणि डॉ. विजयराव माने यांनीही संचालक म्हणून काम केले.

# महिलेची आत्महत्या

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**उमरखेड :** तालुक्यातील ब्राह्मणगाव शिवारातील एका विहिरीत ४२ वर्षीय महिलेचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याने खळबळ उडाली. ही घटना सोमवारी (ता. ७) सकाळी साडेदहाच्या सुमारास उघडकीस आली. रत्नमाला गजानन कनकापूरे (वय अंदाजे ४२, रा. ब्राह्मणगाव) असे मृत महिलेचे नाव आहे.



ब्राह्मणगाव येथील शेतमालक प्रीतम बालाजी मुक्कावार यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या साखरा रोडलगतच्या सर्व्हे क्रमांक १६९ मधील विहिरीत महिलेचा मृतदेह तरंगत असल्याचे शेतशेजारी बापूराव शंकर नाईनवाड यांनी प्रीतम मुक्कावार यांना मोबाईलवरून कळविले.

माहिती मिळताच मुक्कावार यांनी पोलीस पाटील सुनील देवसरकर यांना घटनेची माहिती दिली. पोलीस पाटलांनी तत्काळ उमरखेड पोलिसांना कळविले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत गावकऱ्यांच्या मदतीने विहिरीतून महिलेचा मृतदेह बाहेर काढला. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी उत्तरवार उपजिल्हा रुग्णालय, उमरखेड येथे पाठविण्यात आला. मृतदेहाची ओळख रत्नमाला कनकापूरे अशी पटली आहे. महिलेने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात असला तरी तिच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी प्रीतम मुक्कावार यांच्या फिर्यादीवरून उमरखेड पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.जमादार नरेंद्र पुंड यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उमरखेड पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# कावड यात्रेला भरधाव वाहनाची धडक; एक ठार

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**उमरखेड :** तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील बायपास उड्डाणपुलावर रविवारी रात्री साडेनऊच्या सुमारास कावड यात्रेतील भाविकांना घेऊन जाणाऱ्या ऑटोला भरधाव क्रुझरने पाठीमागून धडक दिली. या भीषण अपघातात विशाल दीपक पवार (वय ३४, रा. नाग चौक, उमरखेड) यांचा जागीच मृत्यू झाला. तर आठ ते दहा भाविक गंभीर जखमी झाले. यातील काही जखमींना पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती आहे.

श्रीक्षेत्र उनकेश्वर येथून उमरखेडकडे येणाऱ्या 'जय श्री महाकाल' कावड यात्रेत महिला, पुरुष आणि तरुणांसह सुमारे २० ते २५ भाविक सहभागी झाले होते. कावड यात्रा उमरखेडच्या दिशेने येत असताना माहूरकडून भरधाव वेगाने आलेल्या क्रुझर वाहनाने





(एमएच २६ ए.के. ७३६७) यात्रेसोबत असलेल्या ऑटोला पाठीमागून जोरदार धडक दिली.

धडक एवढी भीषण होती की ऑटोमधील भाविकांना गंभीर दुखापत झाली. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांसह रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने उमरखेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असलेल्या काही जखमींना नांदेड येथे हलविण्यात आले. दरम्यान, अपघाताची माहिती शहरात वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांनी शासकीय रुग्णालयात गर्दी केली. पवार यांच्या मृत्यूने कावड यात्रेतील भाविकांसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**पथदिवे बंद असल्याने धोका वाढला :** बायपास उड्डाणपुलाच्या परिसरात रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याने अपघाताचा धोका वाढत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. बंद असलेले पथदिवे तातडीने सुरू करून बायपास परिसरात पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. घटनेचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# जुगार अड्ड्यावर धाड; ९ जण ताब्यात

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**उमरखेड :** तालुक्यातील ग्राम आडद येथे इनापूर रोडलगत उघड्यावर सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोफळी पोलिसांनी धाड टाकून नऊ जणांना ताब्यात घेतले. 'एक्का बादशाह' नावाचा जुगार खेळताना ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी रोख रक्कम, सहा मोबाइल आणि नऊ दुचाकी असा एकूण २ लाख ९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

५ सप्टेंबर रोजी पोफळी पोलिसांचे पथक गस्तीवर असताना आडदबाहेर इनापूर रोडजवळ काही जण जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष घटनास्थळी छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच काही जणांनी पळ काढला. मात्र, नऊ जण पोलिसांच्या हाती लागले.

कारवाईत गजानन दत्ता भुरके (३०, आडद), अंकुश मोतीराम डुकरे (३२, आमदरी, ता. पुसद), नामदेव आनंदराव वानोले (३०, आमदरी), सुनील प्रल्हाद रणखांब (३५, झाडगाव), संतोष दादाराव गारोळे (३५, सांडवा), पंजाब उद्धव आमले (३६, आडद), देवानंद रामराव शेळके (३२, आडद), संदेश नानाराव सवंगडे (२५, आडद) आणि ज्ञानेश्वर नारायण वायकुळे (३२, आडद) यांना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी घटनास्थळावरून १७ हजार ६०० रुपये रोख, सहा मोबाइल आणि नऊ मोटरसायकली जप्त केल्या. जप्त दुचाकींची अंदाजे किंमत १ लाख ५५ हजार रुपये आहे.

सहायक निरीक्षक नीलेश शेंबडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार प्रल्हाद राठोड, हवालदार प्रभाकर जाधव, पवन चंदेवाड, माणिक आदेवाड, हिम्मत बंडगर आणि आकाश पाझारे यांच्या पथकाने ही कारवाई केली. या प्रकरणी नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# विद्यार्थीप्रिय शिक्षकाला सेवापूर्तीचा सन्मान

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**उमरखेड :** हदगाव तालुक्यातील मनाठा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या एच.एस.सी. व्होकेशनल विभागातील शिक्षक प्रा. प्रशांत पी. भोजनकर हे नियत वयोमानानुसार प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाल्याने विद्यालयाच्या वतीने त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.



प्रा. प्रशांत भोजनकर यांचा सपत्नीक गौरव

प्रा. भोजनकर यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात अध्यापनासोबतच विविध समित्यांचे काम तसेच प्रशासकीय जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. बोर्ड परीक्षेदरम्यान तालुका कस्टडीयन म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. तसेच तहसील कार्यालयातील निवडणूक कार्यक्रमातही त्यांनी प्रशासकीय कामकाजात योगदान दिले.

हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार सुभाष वानखेडे यांचे स्वीय सहाय्यक म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध, सहकाऱ्यांशी आपुलकी आणि व्यवस्थापन संस्थेशी निष्ठा ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये राहिली.

सेवाकाळात त्यांनी दिलेल्या प्रामाणिक योगदानाबद्दल उपस्थितांनी गौरवोद्गार काढत त्यांच्या कार्याला उजाळा दिला. सत्कार सोहळ्यास विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रा. भोजनकर यांचा मित्रपरिवार उपस्थित होता.

यावेळी सहकाऱ्यांनी व मित्रपरिवाराने सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत प्रा. भोजनकर यांना निवृत्तीनंतरच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अंगणवाडीत चिमुकल्यांना शिक्षणासोबत संस्कारांची शिदोरी

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

■ चिमुकल्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता विविध सण-उत्सवांच्या माध्यमातून संस्कृतीची ओळख व्हावी, यासाठी अंगणवाडीत विविध कार्यक्रम घेण्यात आले. रक्षाबंधनाचे औचित्य साधून चिमुकल्यांकडून रक्षाबंधनाचा उपक्रम घेण्यात आला. गोकुळाष्टमीच्या निमित्ताने बालकांनी बालकृष्णाची वेशभूषा परिधान करून उत्साहात सहभाग घेतला.

**कळंब :** तालुक्यातील डोंगरखर्डा येथील अंगणवाडी क्रमांक तीनमध्ये विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अंगणवाडी सेविका चंद्रकला गणेश पानसे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांमुळे चिमुकल्यांना शिक्षणासोबत भारतीय संस्कृती आणि परंपरांची ओळख करून दिली जात आहे.

पानसे या आपल्या कल्पकतेतून अंगणवाडी केंद्रात सातत्याने विविध उपक्रम राबवितात. अंगणवाडी सेविकेचे कर्तव्य बजावत असतानाच त्या सामाजिक कार्यातही सक्रिय असून, मागील दहा-बारा वर्षांपासून परिसरातील गरजू, अनाथ, दिव्यांग, विधवा महिला तसेच गरजू रुग्णांना मदत व सेवा देण्याचे कार्य करीत आहेत.

श्रावण महिन्याच्या निमित्ताने अंगणवाडीतील चिमुकल्यांसाठी कावड यात्रेचेही आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून मुलांना धार्मिक परंपरा, सण-उत्सव आणि सामूहिक सहभागाचे महत्त्व समजावून देण्यात आले.

शैक्षणिक ज्ञानासोबत सांस्कृतिक व सामाजिक जाणीव रुजविण्याच्या या उपक्रमांचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे. पानसे यांच्या आगळ्या कार्यपद्धतीमुळे अंगणवाडी केंद्रात शिक्षणासोबत संस्कारांचे वातावरण निर्माण झाले आहे.



# 'हर हर शंभू'च्या जयघोषाने आर्णीनगरी दुमदुमली

## माहूर ते आर्णी ३२ किलोमीटरची कावड पदयात्रा; सिद्धेश्वर महादेव मंदिरात जलाभिषेक

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**आर्णी :** श्रावणातील शेवटच्या सोमवारी सिद्धेश्वर महादेव कावड यात्रा समिती, विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने माहूर ते आर्णी कावड पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. सुमारे ३२ किलोमीटरचा पायदळ प्रवास करून कावडधारी भाविकांनी पैनगंगा नदीचे पवित्र जल आणले. या जलाने संभाजीनगर येथील हनुमान मंदिरासह सिद्धेश्वर महादेव मंदिरातील शिवलिंगावर अभिषेक करण्यात आला. यावेळी 'हर हर शंभू, हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण आर्णीनगरी दुमदुमून गेली.

माहूर येथून सोमवारी पहाटे पाच वाजता कावड पदयात्रेला प्रारंभ झाला. कावडीत महादेवाच्या मूर्तीची प्रतिकृती, पिंड तसेच विविध धार्मिक





देखावे सहभागी करण्यात आले होते. जगन्नाथ देवाची प्रतिमा, महादेवाची मूर्ती, तुळजाभवानीची झांकी आणि शिवा शिंदे यांनी साकारलेले 'अघोरी'चे रूप हे यात्रेतील विशेष आकर्षण ठरले.

दुपारी तीनच्या सुमारास कावड यात्रा आर्णीत दाखल झाली. विठ्ठल मंदिर, सोमेश्वर महादेव मंदिर, सराफा, मुख्य मार्गावरून संभाजीनगरमार्गे कावड यात्रा पुढे गेली. शहरातील विविध ठिकाणी नागरिकांनी कावडधारींचे पूजन करून पुष्पवृष्टी केली. भाविकांसाठी ठिकठिकाणी पिण्याचे पाणी व अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली होती. रस्त्यावर काढलेल्या आकर्षक रांगोळ्यांनीही यात्रेचे स्वागत करण्यात आले. कावड यात्रेत महिला, पुरुष, युवकांसह हजारो शिवभक्त सहभागी झाले होते. भजन मंडळांच्या सहभागामुळे तसेच 'हर हर महादेव'च्या जयघोषामुळे शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. रात्री साडेआठच्या सुमारास कावड यात्रा सिद्धेश्वर महादेव मंदिरात पोहोचली. आणलेल्या पवित्र जलाने शिवलिंगावर जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. सिद्धेश्वर महादेव कावड यात्रा समिती, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गावाहिनी तसेच शहरातील शिवभक्तांनी यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. आर्णीकरांनीही ठिकठिकाणी यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले.

# 'हर हर महादेव'च्या जयघोषाने डोंगरखर्डा दुमदुमले

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**कळंब :** श्रावणातील शेवटच्या सोमवारी डोंगरखर्डा येथील शिवमंदिरात भगवान शंकराच्या दर्शनासाठी शेकडो भाविकांनी गर्दी केली. सकाळपासूनच मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. महिला, पुरुष, बालगोपालांसह ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या श्रद्धेने महादेवाचे दर्शन घेतले.

श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार शिवभक्तांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. त्यानिमित्त डोंगरखर्डा येथील शिवभक्त व आयोजक मित्र परिवाराच्या वतीने भाविकांसाठी विविध सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना उपवासाचे पदार्थ तसेच कॉफीचे वाटप करण्यात आले. भाविकांची सेवा करण्यासाठी स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग



नोंदविला.

दरम्यान, कावड यात्रा समिती व समस्त ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने गावात कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. कावडधारी भाविकांनी रामतीर्थ येथे जाऊन वर्धा नदीचे पवित्र जल आणले. या जलाचे विधिवत पूजन करून भगवान शंकराला अभिषेक करण्यात आला. तसेच हनुमान मंदिरासह गावातील विविध मंदिरांमध्ये जल अर्पण करून धार्मिक विधी पार पाडण्यात आले.

कावड यात्रेनिमित्त गावातील प्रमुख चौकातून मिरवणूक काढण्यात आली. यात महिला, पुरुष, बालगोपाल तसेच भजन मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. टाळ-मृदंगाच्या गजरासह भक्तिगीतांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले होते.

कावड यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांनी श्रद्धा व भक्तिभावाने भगवान शंकराचे दर्शन घेतले. श्रावणातील शेवटचा सोमवार असल्याने दिवसभर मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ कायम होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
५
मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# अखेर 'त्या' नरभक्षक वाघिणीचा मृत्यू

## वन विभागाच्या विशेष पथकाने केले होते जेरबंद, उपाचारासाठी नेताच घडली घटना

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अमरावती :** गेल्या काही दिवसांपासून अमरावती व वर्धा जिल्ह्यात दहशत निर्माण करणाऱ्या आणि चार निष्पाप नागरिकांचा बळी घेणाऱ्या नरभक्षक वाघिणीला अखेर वन विभागाच्या विशेष पथकाने सोमवारी चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा परिसरात गुंगीचे औषध देऊन जेरबंद केले होते. या वाघिणीला उपचारासाठी नेत असताना वाटेतच तिचा उशिरा रात्री मृत्यू झाल्याची माहिती अमरावतीचे उपवनसंरक्षक (प्रादेशिक) अर्जुना के.आर. यांनी दिली आहे.

या नरभक्षक वाघिणीने गेल्या २० दिवसांत चार जणांचा बळी घेतला.वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यापासून वाघीणीने प्रवास सुरू केला होता. तेथून अमरावती जिल्ह्यातील वरुड, मोर्शी आणि चांदूर बाजार तालुक्यांत प्रवास करताना तिने पाळीव प्राण्यांवर हल्ले केले तसेच ४ जणांना ठार केले होते. या वाघिणीच्या मृत्यूच्या वृत्तामुळे अमरावती जिल्ह्यातील मोर्शी आणि चांदूर बाजार तालुक्यातील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.



वाघिणीचा माग काढण्यासाठी २४ तास गस्त (आरआरटी), कॅमेरा ट्रॅप, थर्मल ड्रोन आणि दवंडीद्वारे जनजागृती अभियान राबविण्यात आले होते. परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभागाने चोख बंदोबस्त ठेवला होता. वनविभागाच्या पथकाने तांत्रिक बाबींचा आधार घेत वाघिणीला सुरक्षितपणे बेशुद्ध केले, ज्यामुळे परिसरातील मोठा धोका टळला होता. मात्र या वाघीणीला उपचारासाठी नेत असताना ७ सप्टेंबरच्या रात्री उशिरा ती मृत्युमुखी पडल्याची माहिती आहे.

### यांचा झाला होता वाघिणीच्या हल्ल्यात मृत्यू

»१७ ऑगस्ट रोजी रामभाऊ भोयर ( ७४) रा. नरसिंगपूर, जि. वर्धा,२७ ऑगस्ट रोजी चरणदास ईखे (५५) रा. भांबोरा, ता. मोर्शी, ६ सप्टेंबर रोजी उर्मिला बाजीराव इवने (१८) रा. सोनोरी, ता. चांदूर बाजार आणि ७ सप्टेंबर रोजी दिनेश आवारे (४५) रा. शिरजगाव कसबा, ता. चांदूर बाजार हे मृत्युमुखी पडले होते. दरम्यान, वाघिणीच्या हल्ल्यात मृत पावलेल्या सर्व नागरिकांच्या कुटुंबांना वन विभागाच्या वतीने तातडीची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली आहे.

### 24 तासांत दोघांवर केला होता हल्ला

»सोनोरी येथे १८ वर्षीय तरुणीचा बळी गेल्यानंतर आणि २४ तासांच्या आत शिरजगाव कसबा येथे दुसरी घटना घडल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र जनक्षोभ व संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व शोधमोहीम वाघिणीचा वाढता उपद्रव पाहता वन विभागाने युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू केली होती.

वाघिणीला जेरबंद करण्याची कारवाई मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (एनटीसीए) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पार पडली. या मोहिमेत अमरावती वनवृत्तातील अमरावती, मेळघाट (प्रादेशिक) परतवाडा, अकोला वनविभाग, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, वर्धा वनविभागाचे कर्मचारी, पुण्याचे पथक, जिल्हा प्रशासन, पोलीस दल, मानद वन्यजीव रक्षक आणि विविध स्वयंसेवी संस्थांनी मोलाचे सहकार्य केले, अशी माहिती अमरावतीचे उपवनसंरक्षक (प्रादेशिक) अर्जुना के.आर. यांनी दिली.

# राष्ट्रीय स्वच्छ हवा पुरस्कारात महाराष्ट्राचा गौरव

## शहरांमध्ये अमरावती मनपा आणि नाशिक मनपा वॉर्ड क्रमांक सात देशात तृतीय

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अमरावती :** शहरांमधील वायू प्रदूषणाला आळा घालून हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेल्या प्रभावी उपाययोजनांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. 'स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२६' अंतर्गत महाराष्ट्रातील अमरावती शहराला तृतीय क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार, तर नाशिक महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक ७ ला वॉर्डस्तरीय सर्वेक्षणात तृतीय क्रमांक मिळाला आहे. अमरावतीला २५ लाख रुपये, तर नाशिकच्या वॉर्ड क्रमांक ७ ला ३० लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

नवी दिल्ली येथील इंदिरा पर्यावरण भवनातील गंगा सभागृहात आयोजित राष्ट्रीय स्वच्छ हवा पुरस्कार सोहळ्यात हा गौरव करण्यात आला. राष्ट्रीय हरित अधिकरणाचे अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमास हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाचे अध्यक्ष राजेश वर्मा, पर्यावरण सचिव तन्मय कुमार, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष डॉ. अमनदीप गर्ग यांच्यासह केंद्र व राज्य शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**अमरावती मनपाची उल्लेखनीय कामगिरी**

हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ३ ते १० लाख लोकसंख्या गटात अमरावती शहराने राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांक पटकावला. यासाठी शहराला २५ लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी आणि आयुक्त डॉ. मंगेश गोंदवले यांनी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला.

**नाशिकच्या वॉर्ड क्रमांक ७ चा राष्ट्रीय गौरव**

वॉर्डस्तरीय स्वच्छ वायू सर्वेक्षणात ३० हजारांहून अधिक लोकसंख्या गटात नाशिक महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक ७ ने राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांक मिळविला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल वॉर्डला ३० लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. नाशिकच्या महापौर हिमगौरी अडके, उपमहापौर विलास शिंदे, अमित रंजन यांच्यासह प्रतिनिधींनी पुरस्कार स्वीकारला.

'स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२६' मधील राज्यस्तरीय कामगिरीसाठी महाराष्ट्रातील पुणे येथील वॉर्ड क्रमांक ४ व ७ आणि अमरावती येथील वॉर्ड क्रमांक १२ यांची निवड करण्यात आली आहे. या वॉर्डमध्ये हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यासाठी राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, या वॉर्डना विशेष सन्मानित करण्यात येणार आहे.

**देशातील उत्कृष्ट शहरांचाही गौरव**

१० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या गटात उत्तर प्रदेशातील लखनौने प्रथम, मध्य प्रदेशातील इंदूरने द्वितीय, तर जबलपूरने तृतीय क्रमांक मिळविला. ३ ते १० लाख लोकसंख्या गटात ओडिशातील राऊरकेला प्रथम, तर फिरोजाबाद आणि गुंटूर यांनी संयुक्तपणे द्वितीय क्रमांक मिळविला. तीन लाखांपेक्षा कमी लोकसंख्या गटात कलिंग नगर, अंगुल आणि तालचेर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला.

राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरांना एकूण ५ कोटी २५ लाख रुपये, तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वॉर्डना २ कोटी ७० लाख रुपयांची पारितोषिके प्रदान करण्यात आली. ही पारितोषिकाची रक्कम संबंधित शहरांमध्ये वायू प्रदूषण नियंत्रण, हवेची गुणवत्ता सुधारणा आणि स्वच्छ वायूसाठीच्या विविध उपाययोजनांसाठी वापरण्यात येणार आहे.

# ट्रान्सफॉर्मर फोडुन तांबे चोरणारा मास्टरमाईंड अटकेत

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अमरावती :** ट्रान्सफॉर्मर फोडुन त्यातील तांबे चोरणारा मास्टरमाईंड आंतरजिल्हा सराईत गुन्हेगाराला पकडण्यात पोलीस स्टेशन तळेगांव दशासर यांचे मोठे यश आले आहे.

जितेंद्रसिंग संतोषसिंग टाक वय 34 वर्षे रा. अलाना गेवराई ता.जि. छत्रपती संभाजीनगर असे आरोपीचे नाव आहे.



22/08/206 रोजी पोलीस स्टेशन तळेगांव दशासर येथे फिर्यादी नामे राजेश अशोक चांडक वय 41 वर्षे रा. पुलगांव ता. देवळी जि. वर्धा यांनी तक्रार दिली की, त्यांचे पत्नीचे नावे साई मोहिनी क्वॉट्स वर्ल्ड नावाची जिनींग फैक्टरी असुन सदर जिनींगचे लाईन सप्लायकरीता 630 के.व्हि. क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर जिनींग समोरील आवारात लावलेला असुन दिनांक 17/08/2026 रोजी रात्री 12.30 वा.ते 6 वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने नमुद ट्रान्सफॉर्मर फोडुन त्यातील कॉपर कॉईल चोरुन नेला. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन तळेगांव दशासर येथे अपराध क्रमांक 205/2026 कलम 303 (2) भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस स्टेशन तळेगांव दशासर येथील पथक तपास करीत असतांना त्यांना गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरुन तपास पथकाने जितेंद्रसिंग संतोषसिंग टाक रा.अलाना गेवराई ता.जि.छत्रपती संभाजीनगर याचा अत्यंत शिताफीने पाठलाग करुन त्यास नेवासा जि.अहिल्यानगर येथुन ताब्यात घेवुन अटक करुन त्यास सदर गुन्ह्यासंबंधाने सखोल विचारपुस केली असता त्याने सांगीतले की, मी व इतर साथीदारांसह माझे मालकीची मारोती सुझुकी बलेनो कार क्रमांक MH 21 BF 7195 ने ग्राम देवगांव येथे घटनास्थळी येवुन तेथे रेकी करुन नमुद ट्रान्सफॉर्मर फोडुन त्यातील कॉपर कॉईल चोरुन नमुद कार मध्ये टाकुन पळुन गेल्याची कबुली दिली.

# 'आयुष्मान आरोग्य मंदिर'मधून सर्वंकष आरोग्य सेवा बळकट

## जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रशिक्षणाला सुरवात

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अमरावती :** राज्यातील 'आयुष्मान आरोग्य मंदिर' येथे प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी 'सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा' प्रशिक्षण मोहीम राबवली जात आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. यातून सर्वंकष आरोग्य सेवा बळकट करण्यावर भर दिला जात आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांच्या मार्गदर्शनाखाली उजळणी प्रशिक्षण घेण्यात येत आहे. ग्रामीण आणि तळागाळातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण, सक्षम आणि लोकाभिमुख आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशिक्षण होत आहे. दोन दिवसीय कार्यशाळेत आरोग्य कर्मचाऱ्यांना तांत्रिक आणि प्रात्यक्षिक शिक्षण दिले जात आहे.

यामध्ये 13 प्रकारच्या विविध आरोग्य सेवा आणि 14 प्रकारच्या तपासण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. यात गरोदर मातेची काळजी, सुरक्षित प्रसूती आणि बालकांचे वेळेवर लसीकरण, किशोरवयीन मुला-मुलींच्या आरोग्य समस्या आणि समुपदेशन, क्षयरोग, मलेरिया, डेंग्यू व इतर साथीच्या आजारांवर नियंत्रण, मधुमेह, उच्च रक्तदाव आणि कर्करोग यांचे वेळेत निदान व व्यवस्थापन यासह मानसिक आरोग्य, वृद्धपकाळातील आरोग्य व उपशामक सेवा, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, डोळे-नाक-कान-घसा व मौखिक आरोग्य तसेच योग व आयुष पद्धतींचा समावेश आहे.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा प्रशिक्षण केंद्र आणि रुग्णालय प्रशिक्षण केंद्र येथील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत हे प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, सहाय्यिका, आरोग्य सेवक, सेविका, आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक सहभागी झाले आहेत. तालुका आरोग्य अधिकारी आणि टीमच्या नियोजनामुळे या प्रशिक्षणाचा फायदा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी होणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील सीजीडब्ल्यूबी भूजल डेटा विषयावर कार्यशाळा

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अमरावती :** केंद्रीय भूजल बोर्ड (सीजीडब्ल्यूबी) मध्यक्षेत्र नागपूर आणि वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण अमरावती कार्यालयाच्यावतीने 'अमरावती जिल्ह्याती सीजीडब्ल्यूबी भूजल डेटा आणि राष्ट्रीय जलभृत मानचित्रण व व्यवस्थापन अभ्यासाचा प्रसार-उपयोग' विषयावर बचत भवन येथे ३ सप्टेंबर रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे होते. सीजीडब्ल्यूबी मध्यक्षेत्र नागपूरच्या शास्त्रज्ञ श्रद्धा जैन यांनी, 'अमरावती जिल्ह्यातील 'नाक्विम'च्या निष्कर्षांवर' तर याच संस्थेचे शास्त्रज्ञ हितेश रामटेके यांनी सीजीडब्ल्यूबीच्या भूजल पोर्टलबाबत सादरीकरण केले. याच कार्यशाळेत अमरावती जिल्ह्याचा नाक्विम व्यवस्थापन आराखडाही सामायीक करण्यात आला. उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी भूजल डेटाच्या प्रसारासाठी सीजीडब्ल्यूबीने केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करत जिल्हा पातळीवरील नियोजन व शाश्वत भूजल व्यवस्थापनासाठी उपलब्ध संसाधनाचा प्रभावी वापर करण्याची आवश्यकता असल्याचे आपल्या उद्बोधनात सांगितले. कार्यशाळेला जीएसडीए,महानगर पालिका,जिल्हा परिषद लघुसिंचन,जलसंपदा विभाग,मजीप्रा,आरडब्ल्यूएसएस,जिल्हा प्रयोगशाळा,आरडब्ल्यूएस,कृषी विभाग आदी विभागांचे ७४ अधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील आरोग्य संस्थांना फायर, इलेक्ट्रिकल ऑडिट बंधनकारक

## आरोग्य यंत्रणेची उच्चस्तरीय बैठक

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अमरावती :** जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये अग्निसुरक्षा आणि विद्युत सुरक्षितता बळकट करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या डॉ. पंजाबराव सभागृहात उच्चस्तरीय बैठक पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी या बैठकीत महत्वाचे निर्देश दिले.

बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल क्षिरसागर, कार्यकारी अभियंता (विद्युत) आणि जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत, जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांचे फायर ऑडिट आणि इलेक्ट्रिकल ऑडिट तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गांधी यांनी दिले. यासाठी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. तसेच केवळ कागदोपत्री पूर्तता न करता प्रत्यक्ष आपत्कालीन परिस्थितीत तत्परतेने उपाययोजना करता याव्यात, यासाठी प्रत्येक आरोग्य केंद्र आणि रुग्णालयात नियमितपणे 'मॉक ड्रिल' आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

वीज यंत्रणेतील बिघाडामुळे होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी इलेक्ट्रिकल ऑडिटला विशेष प्राधान्य देण्याचे सांगण्यात आले आहे. मुदतीत काम पूर्ण केले नसल्यास प्रशासनाकडून कारवाईचा इशाराही देण्यात आला. सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ही मोहीम गांभीर्याने राबवून रुग्णालयांची सुरक्षा यंत्रणा चोख ठेवावी, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा रविवार पासून तीन दिवसांचा अमरावती जिल्हा दौरा

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अमरावती:** बालगृहांची पाहणी व तपासणी, बालकांच्या हक्कांच्या अनुषंगाने विविध बाबींचा आढावा, तसेच संबंधित प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष संजय पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली ६ ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोगाचा अमरावती जिल्हा दौरा आयोजित करण्यात आल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट यांनी कळविले आहे.

नियोजित कार्यक्रमानुसार ६ सप्टेंबर रोजी आयोगाचे अध्यक्ष व सदस्य अमरावती जिल्ह्यातील बालगृहांना भेटी देणार आहेत. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.३० वा. दरम्यान विविध प्रकरणांची सुनावणी घेण्यात येणार आहे. तर दुपारी १२.३० ते २ वा. पर्यंत आढावा बैठक होणार आहे.दुपारी ३ ते सायं ६ वा. दरम्यान जिल्ह्यातील बालगृहास भेटी देणार आहे. ८ सप्टेंबर रोजी मेळघाट क्षेत्रास आयोग भेट देणार असून प्रकल्प अधिकारी आदिवासी विभाग अमरावती व मेळघाट तसेच इतर बहुजन कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठकही घेणार आहे.

आयोगाच्या दौऱ्यात बालगृहांमध्ये बालकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधा, निवास व भोजन व्यवस्था, आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा, बालकांच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना, समुपदेशन व पुनर्वसनाची कार्यवाही तसेच बालकांच्या मूलभूत हक्कांची अंमलबजावणी याबाबत पाहणी करण्यात येणार आहे. तसेच, बाल हक्क संरक्षणाच्या अनुषंगाने आढावा बैठक घेण्यात येणार असून, संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी व संस्थांचे प्रतिनिधी यांच्याकडून विविध विषयांचा आढावा घेण्यात येणार आहे. बालकांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या समस्या व तक्रारींचे निराकरण आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत आयोगाकडून मार्गदर्शन व सूचना करण्यात येणार आहेत.

# अमरावती राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयात सेवा मिळणे हा नागरिकांचा कायदेशीर हक्क

## माहिती फलकाचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अमरावती:** नागरिकांना शासकीय सेवा विहित कालावधीत, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने मिळाव्यात, यासाठी लागू करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' या कायद्याची व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग यांच्या वतीने तयार करण्यात आलेल्या माहिती फलकाचे लोकार्पण अमरावती परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.महेश पाटील आणि राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही पारदर्शक प्रशासन आणि सुशासनासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आलेल्या या माहिती फलकामध्ये नागरिकांना शासकीय सेवा मिळविण्याची संपूर्ण प्रक्रिया फ्लोचार्टच्या माध्यमातून सोप्या व सुटसुटीत पद्धतीने समजावून सांगण्यात आली आहे. पात्र व्यक्तीने अर्ज केल्यानंतर सेवा नाकारली गेल्यास किंवा विहित कालावधीत सेवा मिळाली नाही, तर संबंधित व्यक्तीस ३० दिवसांच्या आत प्रथम अपील दाखल करता येते. प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयावर समाधान न झाल्यास पुढील ३० दिवसांत द्वितीय अपील, तर त्यानंतर ६० दिवसांच्या आत तृतीय अपील राज्य सेवा हक्क आयोगाकडे दाखल करण्याची तरतूद आहे.

शासकीय सेवा देण्यास विनाकारण विलंब करणाऱ्या अथवा सेवा नाकारणाऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्यावर रु. ५०० ते रु. ५ हजारांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद या कायद्यात आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून कायद्याचा प्रभावीपणे वापर करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. "सेवा मिळणे हा नागरिकांचा कायदेशीर हक्क असून, सेवा देणे ही केवळ शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून कायदेशीर कर्तव्य आहे," हा संदेश यावेळी अधोरेखित करण्यात आला. जातप्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, विविध परवाने तसेच शासकीय मंजुरी यांसह अनेक सेवा 'आपले सरकार' पोर्टलद्वारे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# माहुली जहागीर ग्रामपंचायतीला 25 लाखांची बक्षिस रक्कम मंजूर

## 'माझी वसुंधरा अभियान ४.०' अंतर्गत अमरावती विभागात पटकावला होता पहिला क्रमांक

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अमरावती :** उत्कृष्ट कार्यकरत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या 'माझी वसुंधरा अभियान ४.०'मध्ये अमरावती विभागात पहिल्या क्रमांकाचे बक्षिस पटकावणाऱ्या माहुली जहागीर ग्रामपंचयातीच्या सविस्तर प्रकल्प अहवालातील (डीपीआर) कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करत आज ५० लाखांच्या एकूण बक्षीसातील उर्वरीत २५ लाखांची रक्कम वितरीत करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

'माझी वसुंधरा अभियान ४.०'मध्ये बक्षीस पटकाविणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त डीपीआर अंतर्गत माहुली जहागीर ग्रामपंचयातीच्या अहवालावर चर्चा करून उच्चस्तरीय समितीने केलेल्या शिफारशीअंती ७ सप्टेंबर २०२६ पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने शासन निर्णयाद्वारे ही प्रशासकीय मंजुरी दिली आहे. या अभियानांतर्गत ५ ते १० हजार लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचातींच्या गटात अमरावती विभागात प्रथम क्रमांक पटकविणाऱ्या माहुली जहागीर ग्रामपंचायतीस एकूण बक्षीस रकमेच्या ५० टक्के म्हणजेच २५ लाखांची रक्कम यापूर्वीच वितरीत करण्यात आली आहे. आजच्या शासन निर्णयाद्वारे ग्रामपंचायतीच्या डीपीआरमधील कामांसाठी उर्वरीत २५ लाखांची रक्कम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीकडून शासनास सादर डिपीआरमध्ये ग्रामपंचयातीच्या दुतर्फा झाडे व कुंपन लावणे,वार्ड क्र.३ मध्ये झाडे लावणे,ग्रामपंचायतीवर ४ के.व्ही.क्षमतेचे सोलार उभारणे,गावासाठी पाणी पुरवठा होणाऱ्या विहिरीवर १० के.व्ही. क्षमतेचे सोलार उभारणे, गावात एलईडी दिवे बसवीणे, गावातील ८ही अंगणवाडयांमध्ये पावसाच्या पाण्याच्या संचयनाची व्यवस्था करणे आदी कामांचा अंतर्भाव आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. ८ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







# आर्थिक देवाण-घेवाणीतून कामाचा भार...

# तहसीलदार बनल्या 'रिल्स स्टार'!

## कार्यालयातच रील शूट करून शासकीय नियमांना पायदळी तुडवत 'चमकोगिरी'





**शासनाने तहसीलदारावर निलंबनाची कारवाई केली पाहिजे**

तहसीलदार तेजनकर यांची रील आम्ही पाहिली, मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. रील जर बनवायची ना तर ते शेतकऱ्यांच्या बांधावर जावून बनवली पाहिजे. आज आमच्या शेतकऱ्याच्या सोयाबीनचा फोटो सुद्धा काढावं वाटत नाही. अशी आमच्या शेतकऱ्याची अवस्था झाली आहे. अशा प्रकारची अवस्था जिल्ह्यात असतांना जर राजपत्रित अधिकारी आपल्या कार्यालयात रिल्स बनविण्यात व्यस्त असेल तर, या तेजनकर मॅडमवर शासनाने निलंबनाची कारवाई केली पाहिजे. **राजूभाऊ चौधरी**, जिल्हाध्यक्ष काँग्रेस



शासकीय कार्यालयात रील शूट करून प्रसिद्ध केलेली आहे. ती रिल्स तपासल्या नंतरच योग्य ती कारवाई करण्यात येईल.
**वैशाली देवकर :-**
उपविभागीय तथा दंडाधिकारी, वाशिम

**सोशल मीडियावरून रील व्हिडिओ हटवला, ११ पैकी ८ पोस्ट डिलीट**

वाशिम जिल्ह्यात रील शूट मुळे चर्चेचा विषय ठरलेल्या रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी तहसील कार्यालयात शूट केलेला रील व्हिडिओ आता सोशल मीडियावरून हटवण्यात आला आहे. हा व्हिडिओ 'Pratiksha Tejnkar-Aghav' नावाच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर अपलोड करण्यात आला होता. मात्र, या रीलच्या बातम्या प्रसिद्ध होताच तो व्हिडिओ अकाउंटवरून काढून टाकण्यात आला. इतकेच नव्हे तर संबंधित अकाउंटवरील ११ पैकी ८ पोस्टही हटविण्यात आल्याचे दिसून येत आहे. या घडामोडींमुळे विविध चर्चांना उधाण आले असून, जर संबंधित व्हिडिओमध्ये काहीच गैर नव्हते, तर तो सोशल मीडियावरून का हटविण्यात आले असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

शासकीय पदाचा आणि कार्यालयाचा वापर वैयक्तिक प्रसिद्धीसाठी करण्यास मनाई असताना, वाशिम जिल्ह्यातील रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी चक्क तहसील कार्यालयातच 'प्रोफेशनल सिनेमॅटिक रील' शूट करून शासनाच्या आदेशांना उघड-उघड आव्हान दिले आहे. 'लाईट, कॅमेरा आणि ॲक्शन'च्या थाटात तयार केलेल्या या रीलमुळे प्रशासकीय वर्तुळात तीव्र संताप व्यक्त होत असून, नियम मोडणाऱ्या या तहसीलदार तेजनकरांवर तत्काळ शिस्तभंगाची कडक कारवाई करण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापराबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २८ जुलै २०२५ रोजी स्पष्ट परिपत्रक जारी केले आहे. या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे प्रत्येक शासकीय अधिकाऱ्यासाठी बंधनकारक आहे. मात्र, तहसीलदार मॅडमनी या सर्व नियमांना पायदळी तुडविले आहे. परिपत्रकातील नियम १० नुसार, वैयक्तिक सोशल मीडिया अकाउंटवर फोटो, रील किंवा व्हिडिओ अपलोड करताना शासकीय पदनाम, लोगो, गणवेश तसेच शासकीय इमारत व वाहनांचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. मात्र, तेजनकर यांनी आपल्या रीलमध्ये 'तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी' असा नावाचा फलक, शासकीय खुर्ची, राष्ट्रीय ध्वज आणि बोधचिन्ह स्पष्टपणे दाखवून नियमालाच केराची टोपली' दाखवली आहे. तर परिपत्रकातील नियम ८ आणि ९ मध्ये शासकीय कामाचे प्रदर्शन करताना किंवा सोशल मीडियावर पोस्ट करताना 'स्वयंप्रशंसा' होणार नाही, याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. तरीही, वैयक्तिक प्रसिद्धीच्या मोहापोटी कार्यालयातच व्यावसायिक कॅमेरामन लावून हे चित्रीकरण करण्यात आले आहे. शासनाने जारी केलेल्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक १४ नुसार, या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यावर 'महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९' अन्वये कडक शिस्तभंगविषयक कारवाईची तरतूद आहे. नियम फक्त सामान्य नागरिकांनी आणि लहान कर्मचाऱ्यांनीच पाळायचे का? स्वतः कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणाऱ्या तालुका दंडाधिकाऱ्यानेच अशा प्रकारे नियम धाब्यावर बसवले असतील, तर त्यांच्यावर केवळ कारणे दाखवा नोटीस न बजावता प्रत्यक्ष निलंबनाची किंवा कडक शिस्तभंगाची कारवाई झालीच पाहिजे, अशी तीव्र भावना वाशिम जिल्ह्यातील जनतेतून व्यक्त होत आहे. आता वरिष्ठ अधिकारी आणि शासन या 'रीलस्टार' तहसीलदार प्रतिक्षा तेजनकरांवर काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

## थोडक्यात

### काँग्रेसच्या शहर अध्यक्षपदी सय्यद आजम यांची नियुक्ती



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मंगरूळपीर येथील. सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेसचे एकनिष्ठ माजी नगरसेवक यांना पूर्व प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेसचे शहर अध्यक्ष म्हणून नियुक्तीपत्र काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव जी ठाकरे यांनी सय्यद आज़म यांना दिले. यावेळी आमदार अमितजी झनक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजूभाऊ चौधरी प्रमुख उपस्थिति होती. सय्यद आज़म यांना पक्ष बांधण्याची जबाबदारी देऊन पुढील कार्यास शुभेच्छा सुद्धा देण्या आल्या. त्यांच्या निवडीने मंगरूळपीर शहरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले

### मातोश्री पार्वतीबाई नाईक कन्या शाळेत 'स्वयंशासन दिन' साजरा



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मातोश्री पार्वतीबाई नाईक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात, मातोश्री पार्वतीबाई नाईक बहुउद्देशीय शिक्षण संस्था वसंतनगर (पोहरादेवी) चे संस्थापक अध्यक्ष स्व. विष्णुदासजी नाईक साहेब यांच्या १४ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त 'सामान्य ज्ञान' परीक्षेचे आयोजन करून गुणवंत विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. तसेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त 'स्वयंशासन दिन' अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक प्रकाश राठोड होते, तर उद्घाटक म्हणून श्री श्री १००८ गिरीश चैतन्यजी महाराज तर. अतिथी म्हणून महंत १०८ श्री श्री लोकेशानंद महाराज, महंत १०८ श्री श्री हिम्मत महाराज, भागवताचार्य महंत मोहनदासजी महाराज, श्रीमती सिंधुताई देविदास पवार, कृ.उ. बाजार स.वाशिम चे माजी सचिव बबनराव इंगळे, सामाजिक कार्यकर्त्या सौ वर्षा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव विलास राठोड, संस्थेचे उपाध्यक्ष तथा माजी प्राचार्य संतोष राठोड, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या कु. सुनीता पवार मॅडम, प्राचार्य कुलदीप बदर, अनुदानित वस्तीगृह संघटनेचे अध्यक्ष कैलास जाधव, डॉक्टर मनोज गट्टानी, पत्रकार शरद येवले, कु. खुशबू राठोड, एडवोकेट साक्षी सुरेश राठोड, पार्थ राठोड उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि स्व. विष्णुदासजी नाईक साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा स्वागत सोहळा पार पडला. उपस्थितांनी डॉ. राधाकृष्णन आणि स्व. विष्णुदासजी नाईक साहेब यांच्या जीवनप्रवासाला व समाजकार्याला उजाळा दिला. यानंतर दहिहंडी चा कार्यक्रम पार पडला, त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वयंशासन दिनाचा उपक्रम राबवला. शेवटी सर्व मान्यवर आणि विद्यार्थ्यांनी स्नेहाचा (सुरुची) आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. खुशबू राठोड व सहाय्यक शिक्षक एन. आर. राठोड यांनी केले, प्रास्ताविक एम. डब्ल्यू. भगत यांनी मांडले, तर आभार पी. एस. दारव्हेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील कर्मचारी कु. एल. एस. ठाकरे, कु. एम. आर. आंधळे, कु. जयश्री राठोड, ए. एन. खाडे, ए. जे. राठोड, बाळू भगत, शिवदास बुधे, विनायक पवार आणि रवींद्र जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

# योजना नको कागदावर, पोहोचवा लाभार्थ्यांच्या दारावर - खा.देशमुख

## जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) सभा

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने आणि परिणामकारकपणे काम करावे. योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींचा पाठपुरावा शासनस्तरावर करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही खासदार संजय देशमुख यांनी दिली.



नियोजन भवनातील सभागृहात आज, ७ सप्टेंबर रोजी आयोजित जिल्हा समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सईताई डाहाके, आमदार श्याम खोडे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे यांची प्रमुख उपस्थिती होती. खासदार संजय देशमुख म्हणाले, जिल्ह्याची आकांक्षित जिल्हा म्हणून असलेली ओळख पुसण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. नीती आयोगाकडे आवश्यक प्रस्ताव सादर करावेत. विविध विकासकामांचे डीपीआर तयार करताना त्यांची निश्चित वेळेत अंमलबजावणी होईल, याचेही नियोजन करावे. महावितरण विभागाशी संबंधित नागरिकांच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात असल्याने त्या तातडीने निकाली काढाव्यात. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांशी सौजन्याने वागावे. विभागामार्फत करण्यात येणाऱ्या विकासकामांचा दर्जा गुणवत्तापूर्ण असावा. निधीअभावी प्रलंबित किंवा अपूर्ण असलेल्या कामांची यादी तातडीने सादर करावी, जेणेकरून त्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करता येईल, असेही त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि वयोवृद्धांसाठीच्या योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करावे. स्वच्छ भारत मिशनअंतर्गत वैयक्तिक शौचालयांचे उद्दिष्ट पूर्ण करावे. जलजीवन मिशनअंतर्गत गावांमध्ये प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू झाला आहे किंवा नाही, याची खातरजमा करावी. प्रत्येक तालुक्याचा याबाबत आढावा घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधींनाही माहिती द्यावी. दिव्यांग प्रमाणपत्राच्या अनुषंगाने शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात. ई-श्रम कामगारांची नोंदणी वाढवावी. पोलिस विभागाने गस्तीचे प्रमाण वाढवावे. सध्या पिकांना सिंचनाची आवश्यकता असल्याने महावितरणने वीजपुरवठ्याशी संबंधित तक्रारी तातडीने निकाली काढण्यासाठी आवश्यक पुढाकार घ्यावा, असे निर्देश खासदार देशमुख यांनी दिले. बैठकीच्या सुरुवातीला १६ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या दिशा समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताचा अनुपालन अहवाल सादर करण्यात आला. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर म्हणाले, शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक ते निर्देश वेळोवेळी देण्यात येत आहेत. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक किरण कोवे यांनी बैठकीत सादरीकरण केले. यावेळी सर्व नगरपालिका व नगरपंचायतींचे नगराध्यक्ष, नगरसेवक, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, समितीचे अशासकीय सदस्य तसेच विविध विभागांचे कार्यालयप्रमुख उपस्थित होते.

---

# पावसाचे पडेना पाणी, पिकाची होते हाणी !

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मंगरूळपीर तालुक्यातील ग्राम दस्तापुर येथे शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिके पाण्याअभावी जागेवरच कोमाजली असून शेतकरी पावसाची वाट पहात असून सध्या शेतकऱ्यावर मोठ्या प्रमाणात संकट येण्याची शक्यता नाकारता येणार नाही कारण ज्यावेळेस सोयाबीन व इतर पिकाला पाणी पाहिजे त्यावेळेस मात्र पावसाने डोळे झाकले म्हणून शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

जर पावसाने अशाच प्रकारे तळण दिली तर शेतकऱ्याची पिके शेतातच वाळून गेल्याशिवाय राहणार नाहीत म्हणून सध्या



शेतकरी उभे पिके वाळत चालल्याने त्याच्यापुढे फार मोठा प्रश्न उभा राहणार आहे कारण लोकांचे कर्ज मुलांच्या शाळेचा खर्च आणि वेळोवेळी येणारे सणासुदीचे दिवस त्यामुळे चांगलाच अडचणीत सापडणार आहे.

---

# आजार नसताना पोटात दाखवला कोंब, डॉक्टरच्या बनवाबनवीची झाली बोंब!

***'मुलाला काहीही आजार नसताना उपचाराच्या नावाखाली पैशांची उकळपट्टी'**
***डॉक्टरांविरोधात आरोग्य मंत्राकडे तक्रार करणार - सुभाष देवढे पाटील**

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मालेगाव तालुक्यातील एका युवकाला पोटदुखीवर उपचारासाठी रुग्णालयात नेल्यानंतर सोनोग्राफी केली . पोटात कोम नसताना सोनोग्राफीत दोन वेळा कोम दाखविला. ऑपरेशनसाठी ५० हजार रुपये खर्च येणार असल्याचे सांगण्यात आल्याचा आरोप सुभाष देवढे पाटील यांनी केला आहे.

वाशिम शहरातील नामांकित डॉक्टर व सोनोग्राफी सेंटरच्या संगनमताने रुग्णाच्या जीवनाशी खेळ सुरू आहे. कोणताही आजार नसताना सोनोग्राफीत दोन वेळा आजार दाखवून रुग्णाची लूट करण्यात येत आहे.





तक्रारदार महिलां व सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे म्हणण्यानुसार, डॉक्टरांनी सुरुवातीला १० हजार रुपये घेतले, मात्र त्याची पावती दिली नाही. नंतर मुलाला दुसऱ्या संभाजीनगर येथील घाटी सरकारी रुग्णालयात दाखविल्यानंतर तपासणीत मुलाला कोणताही आजार नसल्याचे सांगण्यात आल्याचा दावाही तिने केला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधित डॉक्टरांवर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करून न्याय द्यावा, अशी मागणी महिलेने मागणी केली आहे. शिवाय या प्रकरणाची तक्रार आरोग्य मंत्राकडेही करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी सांगितले.

---

**निसर्ग कोपला, सरकार झोपलं...**

# पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांचे चिखली सबस्टेशनवर मुक्काम !

***मनमानी लोडशेडिंग, वीज खंडित होणे, ट्रान्सफॉर्मर जळणे बदलण्यास विलंब * महावितरणच्या अधिकाऱ्यांना ग्रामस्थांचा जाब**

• दिपक मापारी @ रिसोड •

रिसोड:- पावसाने मोठी दडी मारल्याने सोयाबीनसह खरीप पिके पाण्याअभावी वाळण्याच्या मार्गावर असताना महावितरणकडून सुरू असलेल्या कथित मनमानी वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. शेतीसाठी आवश्यक असलेल्या वीजपुरवठ्यात वारंवार खंड पडणे, पाच-पाच मिनिटांनी वीज ये-जा करणे, अनियमित लोडशेडिंग तसेच जळालेले ट्रान्सफॉर्मर वेळेत बदलले जात नसल्याच्या निषेधार्थ घोटा, चिखली, व्याड व कवठा परिसरातील संतप्त शेतकऱ्यांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे यांच्या



नेतृत्वाखाली चिखली सबस्टेशनवर मुक्काम आंदोलन सुरू केले.

दिवसभर सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेऊनही रात्री उशिरापर्यंत ठोस तोडगा निघाला नसल्याने आंदोलनकर्त्यांनी सबस्टेशन परिसरातच मुक्काम करण्याचा निर्णय घेतला. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत आंदोलनस्थळावरून हटणार नाही, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली.

**रात्री दोन वाजता अधिकाऱ्यांची आंदोलनकर्त्यांशी चर्चा...**

आंदोलन रात्री उशिरापर्यंत सुरू राहिल्यानंतर महावितरणचे अधिकारी अंजेनकर साहेब यांनी रात्री सुमारे दोन वाजता आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांशी चर्चा केली. यावेळी शेतकऱ्यांनी वीजपुरवठ्याच्या समस्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत जळालेले ट्रान्सफॉर्मर तातडीने बदलणे, गावठाण फिडरचा वीजपुरवठा सुरळीत करणे तसेच शेतातील विद्युत पुरवठा नियमित करणे या प्रमुख मागण्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांचे चिखली सबस्टेशनवर रात्री ११ वाजता मुक्काम मनमानी लोडशेडिंग, वारंवार वीज खंडित होणे आणि जळालेले ट्रान्सफॉर्मर बदलण्यास विलंब, महावितरणच्या अधिकाऱ्यांना ग्रामस्थांचा जाब चर्चेनंतर अधिकाऱ्यांनी सकाळपर्यंत जळालेले ट्रान्सफॉर्मर बदलण्यासह गावठाण फिडर व शेतातील वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले.

---

# एच.आर.पी. मॉल समोर दुचाकींचा अपघात

## दोन तरुण गंभीर जखमी

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

कारंजा ते मंगरूळपीर रोडवरील एचआरपी मॉल समोर आज दुपारी २:०० वा. दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात सागर बबन व्यवहारे वय २३, रा. गायवळ व प्रवीण अलोणे वय ३५ रा निंभा (जहागीर) दोन युवक गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, भरधाव वेगाने येणाऱ्या दोन दुचाकींची समोरासमोर टक्कर झाली. धडक इतकी जोराची होती की दोन्ही दुचाकींचे मोठे नुकसान झाले असून दोन्ही चालक रस्त्यावर पडले होते. या घटनेची माहिती मिळताच अन्नपूर्णा केटरिंग सर्व्हिसेसचे संचालक महेश पाटील चौधरी यांनी सामाजिक बांधिलकी जपत तात्काळ श्री. गुरु मंदिर रुग्णवाहिका सेवेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांना फोनवरून अपघाताची माहिती दिली. माहिती मिळताच क्षणाचाही विलंब न करता रुग्णसेवक रमेश देशमुख यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तात्काळ आई एकवीरा रुग्णवाहिकेचे विनोद खोड, तसेच श्री गजानन महाराज रुग्णवाहिकेचे दीपक सोनोने यांना घटनास्थळी पाचारण केले. यावेळी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज रुग्णवाहिकेचे चालक नितीन मानकर पाटील, तालुका आरोग्य सदस्य धनंजय राठोड, अजय घोडेस्वार, रुग्णसेवक खडसे, शुभम खोंड हे देखील मदतीसाठी घटनास्थळी उपस्थित होते. सर्व रुग्णसेवकांनी एकत्र येत मानवतेचे दर्शन घडवत जखमींना तात्काळ उचलून कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

# 'जय भोले'चा गजर, डीजेचा दणदणाट; खामगावात कावड यात्रेचा जल्लोष !

## २४ कावड मंडळांचा सहभागः विविध धार्मिक देखावे आणि वेशभूषांनी मिरवणुकीची वाढविली रंगत!

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**खामगाव :** श्रावणातील शेवटच्या सोमवार निमित्त ७ सप्टेंबर रोजी खामगाव शहरात भव्य कावड यात्रा काढण्यात आली. नांदुरा रोडवरील सुटाळा बु, येथून सकाळी मिरवणुकीला प्रारंभ झाला. विविध तीर्थक्षेत्रांहून पवित्र जल घेऊन आलेल्या कावडधारींचे सुटाळा बु, येथे स्वागत करण्यात आले. त्यानंतर एकापाठोपाठ विविध मंडळे मिरवणुकीत सहभागी झाली. शहरातील विविध भागांतील २४ सार्वजनिक मंडळांचा कावड यात्रेत सहभाग होता. डीजेच्या तालावर शिवभक्तांनी ठेका धरला, तर 'जय भोले'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. मागील काही वर्षात खामगावातील कावड यात्रेला व्यापक स्वरूप प्राप्त झाले असून, विविध सार्वजनिक मंडळांकडून हा धार्मिक उत्सव उत्साहात साजरा केला जातो. शेवटच्या श्रावण सोमवारनिमित्त पवित्र जल आणण्यासाठी विविध







मंडळांचे कावडधारी तीर्थक्षेत्रांकडे रवाना झाले होते. तेथून कावडीत जल घेऊन हे शिवभक्त ७ सप्टेंबर रोजी सकाळी खामगावात दाखल झाले

**शिवमंदिरांमध्ये गर्दी!**

शहरातील ओंकारेश्वर स्मशानभूमी परिसरातील शिवमंदिरासह विविध शिवमंदिरांत कावडधारी शिवभक्तांनी आणलेल्या पवित्र जलाने जलाभिषेक करण्यात आ ल ा . यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. त्यामुळे दिवसभर भक्तिमय वातावरण होते.

**कडेकोट बंदोबस्त !**

सुटाळा बु., येथून सुरू झालेली मिरवणूक जलंब नाका, कार्ट चौक, टॉवर चौक आणि बसस्थानक या मार्गाने काढण्यात आली. मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कावड यात्रेच्या पार्श्वभूमीवर ७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला. नांदुरा रस्त्यावरील वाहतूक वळविली होती.

**शेवटच्या सोमवारची परंपरा**

श्रावणातील शेवटचा सोमवार हा शिवभक्तांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. या पार्श्वभूमीवर खामगावातील विविध सार्वजनिक मंडळांनी कावड यात्रेची परंपरा कायम ठेवली.

तीर्थक्षेत्रांहून पवित्र जल आणून ते शिवमंदिरात अर्पण करण्यासाठी कावडधारी मिरवणुकीत सहभागी झाले. त्यामुळे धार्मिक परंपरेसोबत सार्वजनिक सहभागाचेही चित्र पाहायला मिळाले.

# 'हर हर महादेव'च्या जयघोषात जळगाव जामोदात कावड यात्रा

## कालभैरव व अंबिका माता कावड मंडळांचा सहभाग

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**जळगाव जामोद :** श्रावणातील शेवटच्या सोमवारी जळगाव जामोद शहर शिव भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले. 'हर हर महादेव', 'हर बोला महादेव','जय भोले शिवशंकर'च्या जयघोषाने शहर दुमदुमले. ढोल-ताशांचा गजर, डीजेचा निनाद आणि भगव्या ध्वजांनी सजलेल्या कावड यात्रांमध्ये तरुणाईसह महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कालभैरव कावड मंडळाच्या वतीने नांदुरा रोडवरील महाराष्ट्र बँकेपासून कावड यात्रेला प्रारंभ झाला. माजी मंत्री तथा आमदार डॉ. संजय कुटे आणि डॉ. अपर्णा कुटे यांच्या वतीने महाआरती करून यात्रेला सुरुवात करण्यात आली.माजी नगरसेवक नीलेश शर्मा यांच्या मार्गदर्शनात शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करीत कावड यात्रा पुरातन निळकंठेश्वर मंदिरात पोहोचली. तेथे महाआरतीनंतर शिवभक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, युवक आणि महिलांची मोठी उपस्थिती होती. कावड मिरवणुकीत नगराध्यक्ष गणेश दांडगे, उपाध्यक्ष कैलास पाटील, निलेश शर्मा, परीक्षित ठाकरे, अजय वंडाळे, बंडू पाटील यांच्यासह शहरातील शिवभक्त आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.अंबिका माता कावड ग्रुपच्या वतीने महाआरती माळीखेल येथील अंबिका माता कावड ग्रुपच्या वतीनेही कावड यात्रा काढण्यात आली. निळकंठेश्वर मंदिरात महाआरतीने यात्रेची सांगता झाली. या यात्रेत विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व माळीखेलमधील युवक सहभागी झाले होते. उद्धवसेनेचे जिल्हाप्रमुख गजानन वाघ, दत्तात्रय पाटील, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ॲड. बाळासाहेब भालेराव, डॉ. सतीश शिरकार, अविनाश उमरकर, नीलेश तायडे, वैभव उमरकर, शुभम पाटील व तुकाराम काळपांडे यांची उपस्थिती होती.

# पिंपळगाव येथे कीटकनाशक जनजागृती अभियान

## सेंद्रिय शेती व पर्यावरणपूरक उपाय अवलंबण्याचे आवाहन

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**जळगाव जामोद :** पिंपळगाव काळे येथील बापूमिया सिराजोद्दीन पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने शनिवारी शेतकऱ्यांसाठी कीटकनाशक जनजागृती अभियान राबविण्यात आले. सातपुडा शिक्षण व ग्रामीण विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सलीम पटेल यांच्या प्रेरणेने, तसेच सहसचिव रब्बानी देशमुख व प्राचार्य डॉ. शत्रुघ्न जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळगाव काळे, हशमपूर, वडगाव गड, आसलगाव व खांडवी या गावांमध्ये शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला.<या अभियानाचा उद्देश ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत वैज्ञानिक माहिती कीटकनाशकांच्या अयोग्य होणाऱ्या वापरामुळे आरोग्यविषयक परिणामांपासून त्यांचे संरक्षण करणे तसेच पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन देणे हा असल्याचे प्रा. डॉ. प्राजक्ता बाठे यांनी प्रस्तावनेत सांगितले. डॉ. आनंद जाधव यांनी कीटकनाशकांची योग्य निवड, मात्रा, फवारणीची वेळ व पद्धत, औषधांची सुरक्षित हाताळणी आणि साठवणूक याबाबत मार्गदर्शन केले.

**शेतकऱ्यांशी साधला संवाद**

फवारणी करताना घ्यावयाची काळजी तसेच रिकाम्या कीटकनाशकांच्या बाटल्यांची योग्य विल्हेवाट याबाबतही माहिती देण्यात आली. डॉ. नूर मोहम्मद, डॉ. निखील अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले. या अभियानात परेश अवचार व शेख जुबेर यांनीही सक्रिय सहभाग घेत शेतकऱ्यांशी संवाद साधला. 'सुरक्षित शेतकरी, सुरक्षित शेती, सुरक्षित अन्न, सुरक्षित पर्यावरण' हा संदेश या अभियानातून देण्यात आला.

# विद्युत डीपीची तार चोरी करताना दोघे ताब्यात; 5 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**मलकापूर :** रणथम येथील बसस्थानकासमोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ लगत असलेल्या महावितरणच्या डीपीची तार कटरच्या सहाय्याने चोरी करताना दोघांना पकडण्यात आले. ही कारवाई ६ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास करण्यात आली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात दोन आरोपींसह दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रणथम येथील रहिवासी जयदीप पंडीतराव पाटील (वय ५२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, प्रतापसिंग सुरजसिंग बावरी (वय २०) व कपुरसिंग सुरजसिंग बावरी (वय २५, दोघेही रा. म्हाडा कॉलनी, मलकापूर) हे दोन अज्ञात साथीदारांसह छोटा हत्ती वाहनातून रणथम येथे आले होते. रात्रीच्या सुमारास महावितरणच्या डीपीची तार कटरच्या सहाय्याने कापून चोरी करताना ते आढळून आले.

पोलिसांनी कारवाई करून आरोपींकडून अंदाजे ५ हजार ५०० रुपये किमतीची ॲल्युमिनियमची तार, १ हजार रुपये किमतीचा लोखंडी तार कटर तसेच एमएच-१२-टीव्ही-९०४३ क्रमांकाचे अंदाजे पाच लाख रुपये किमतीचे छोटा हत्ती वाहन असा एकूण ५ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १०९/२०२६, कलम ३०३ (२), ३ (५) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बीट पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीप रमेश पवार करीत आहेत.

# ओबीसींच्या 14 मागण्यांवर शासन निर्णय काढा

## राष्ट्रीय ओबीसी युवा महासंघाचा सरकारला थेट इशारा; खामगावात निवेदन

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**खामगाव :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्यावतीने ऑगस्ट २०२५ मध्ये नागपूर येथील संविधान चौकात सलग १५ दिवस करण्यात आलेल्या साखळी उपोषणानंतर ९ सप्टेंबर २०२५ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे झालेल्या बैठकीत लिखित स्वरूपात मान्य करण्यात आलेल्या ओबीसी समाजाच्या १४ मागण्यांवर तातडीने शासन निर्णय काढावा, या मागणीसाठी सोमवारी खामगाव येथे उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन राष्ट्रीय ओबीसी युवा महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुरज बेलोकार यांच्या नेतृत्वात देण्यात आले.

**सरकारला आता ३० दिवसांची मुदत !**

सरकारने मान्य केलेल्या अंमलबजावणी मागण्यांची करण्यासाठी आता ३० दिवसांची मुदत देत आहोत. या ३० दिवसांत १४ मागण्यांवर ठोस शासन निर्णय काढून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली नाही, तर ओबीसी युवा महासंघ महाराष्ट्रभर आंदोलन छेडेल आणि प्रसंगी मुंबई जाम आंदोलन उभारेल,' असा स्पष्ट इशारा प्रदेशाध्यक्ष सुरज बेलोकार यांनी दिला. ओबीसींच्या हक्कांशी खेळाल तर सरकारला रस्त्यावर उतरून उत्तर देऊ, ओबीसी विद्यार्थ्यांना



१०० टक्के शिष्यवृत्ती, महाज्योतीसाठी १,००० कोटींची तरतूद, ओबीसी आर्थिक विकास महामंडळासाठी १,००० कोटींची तरतूद, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व अभ्यासिका, आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज योजनांमधील जाचक अटी शिथिल करणे, परदेशी शिष्यवृत्तीतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे, पीएच. डी. संशोधकांची प्रलंबित फेलोशिप अदा करणे, ओबीसी शेतकऱ्यांसाठी सवलतीच्या योजना सुरू करणे आदी मागण्यांचा या १४ मागण्यांमध्ये समावेश आहे. ओबीसी समाजाच्या मागण्या मान्य करायच्या, आंदोलन शांत करायचे आणि नंतर फाईल मंत्रालयात धूळ खात ठेवायची, हा प्रकार आता खपवून घेतला जाणार नाही, असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. मुंबईला जाणारा ओबीसींचा लोंढा सरकारला थांबवायचा असेल तर निर्णय घ्या, ओबीसी समाज संयमी आहे, मात्र संयमाचा अर्थ कमजोरी नाही. सरकारने दिलेला शब्द पाळला

नाही तर महाराष्ट्रातील ओबीसी समाजाला सोबत घेऊन मुंबईच्या दिशेने कूच करु, मुंबईच्या सत्ताकेंद्राला ओबीसींच्या आवाजाने हादरवून सोडू आणि गरज पडल्यास मुंबई जाम करू, असा इशारा सुरज बेलोकार यांनी दिला. सरकारने आता बैठका, समित्या, आश्वासने आणि कागदी घोडे नाचविण्याचा खेळ बंद करून मान्य केलेल्या १४ मागण्यांवर शासन निर्णय काढावा, अशी मागणी करण्यात आली.

सदर निवेदन देतांना गणेश चौकसे, बंटी रोकडे, सदाशिव क्षीरसागर, अनिल मुलांडे, रामेश्वर कापडे, अस्लम पटेल, संतोष आटोळे, प्रतीक लोखंडकार, भगवान लाहूडकार, तहसीन शाह, विनोद लाहूडकार, संजय धोंड, रफिक शाह, वैभव खोंडील यांच्यासह अनेक ओबीसी बांधव व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदुरा तालुका दुष्काळग्रस्त घोषीत करण्याची शिवसेना (उबाठा)ची तहसीलदारां मार्फत जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**नांदुरा :** नांदुरा तालुक्यात मागील ३८ दिवसांपासून पाऊसचा थेंब नाही, खरडी बरडी वरील पिके १००% गेलेली आहे तर सोयाबीन, कापूस,तूर , ज्वारी ही पिके सुकत आहे शेतकरी चिंताग्रस्त आहे काही शेतकरी कस होईल या चिंतेने जिवाचे काही ही करु शकतो म्हणून शिवसेना( उध्दव ठाकरे) पक्षाचे वतीने शासनाने ज्यांनी पिक वीमे काढले त्यांना १००% विमा देण्यात यावी तसेच ज्या शेतकऱ्यांनी पिकं विमा भरलेला नाही त्या शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये देण्यात यावे यासह इतर शेतकऱ्यांच्या हिताचे निवेदन तहसीलदार मार्फत जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की नांदुरा तालुक्यामध्ये गेल्या दीड महिन्यापासून पाऊस नसल्यामुळे नांदूरा तालुक्यातील शेतकरी आर्थिक परिस्थितीमध्ये सापडलेला आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेतातील कामे खते व फवारणी करून आपल्या शेतात पिकांची पेरणी केली मात्र पावसाअभावी सोयाबीन, तूर, कपाशी, खरीप



पिके पाण्याअभावी वाळून गेली आहे. शासनाने कर्जमाफी जाहीर करूनही अद्यापही शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नसल्याने शेतकऱ्यांवर आस्मानी संकट कोसळले आहे, तरी शासनाने या परिस्थितीत दखल घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी नांदुरा तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करावा, कर्जबाजारी संकटात शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा जिल्हा सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने, उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर शिवसेना उपतालुका प्रमुख विष्णू धोरण, राजेश पालकर, पुरुषोत्तम सोनवणे, अनिल राहणे, प्रशांत पेटकर, आक्रोश तारू, इमरान लकी, सै. वसीम सै रहीम, पुरुषोत्तम बाभुळकर, विनोद होणाळे, अमोल तायडे, ऋषिकेश तायडे, दिलीप कोल्हे, रामकृष्ण वानखेडे, गोपाळ देवकर, विनोद बावस्कर, अरुण अढाव, निलेश अढाव, योगेश अहिर, आकाश धांडे, उखर्डा लाहुडकर, ज्ञानेश्वर खंडागळे, रविकांत गावंडे, राहुल खंडेराव, सुभाष पांडे, गजानन खंडागळे सह तालुक्यातील शेतकरी व शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांना एसटी बसेस च्या पासेस काढण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी लावण्याची शिवसेना (उबाठा)ची मागणी

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**मलकापूर:** मलकापूर बस स्थानकात विद्यार्थ्यांच्या बसेसच्या पास काढण्यासाठी दोनच कर्मचारी असून विद्यार्थ्यांच्या मोठ्या रांगाच्या रांगा पासेस काढण्यासाठी आठ दिवसांपासून लागत आहे. आज सकाळी नऊ वाजे दरम्यान एका विद्यार्थ्याला चक्कर येऊन पडल्याने याबाबतची माहिती संबंधित पालकांनी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांना दिल्याने त्यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांसह आगार व्यवस्थापक देशमाने यांची भेट घेऊन कर्मचारी वाढविण्याची मागणी केली आहे. याबाबत सविस्तर उत्तर सुखी गेल्या आठ दिवसापासून एसटी बसेस च्या पासेस



काढण्यासाठी विद्यार्थिनी व विद्यार्थिनींच्या भल्या मोठ्या रांगा बस स्थानकावर पहाटेपासूनच लागत आहे.पासेस काढण्यासाठी दोनच कर्मचारी असल्याने त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्याने अतिरिक्त कर्मचारी वाढून व विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधाही करण्याची मागणी शिवसेनेने केली आहे. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर अल्पसंख्यांक सेना उपजिल्हाप्रमुख सै. वसीम सै. रहीम, शिवसेना उपशहरप्रमुख शकील जमादार, युवा सेना शहरप्रमुख मंगेश सातव, वाहतूक सेना शहर प्रमुख इम्रान लकी, विभागप्रमुख सत्तार शाह,राहुल हिवाळे, निंबाजी तायडे,दिनानाथ गारमोडे ,मयूर हिवाळे,आदित्य हिवाळे सह आदिंची उपस्थिती होती.



# खामगावातील शेकडो विद्यार्थ्यांनी घडवल्या ईको-फ्रेण्डली बाप्पाच्या सुबक प्रतिमा

## चिमुकल्यांनी घेतला पर्यावरण संवर्धनाचा ध्यास

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**खामगाव :** जलस्रोत सुरक्षित व अबाधित राहावेत आणि पर्यावरण संवर्धनास हातभार लागावा या उद्देशाने खामगाव येथे 'ईको-फ्रेण्डली गणेशमूर्ती कार्यशाळा व प्रशिक्षण वर्गा'चे उत्साहात आयोजन करण्यात आले. लायन्स क्लब खामगाव संस्कृती, वर्ल्ड फॉर नेचर आणि नॅशनल हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८:३० ते ११ या वेळेत हे प्रशिक्षण पार पडले. आठ वर्षांपासून लायन्स क्लब खामगाव संस्कृती द्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या या उपक्रमात यंदा 'वर्ल्ड फॉर नेचर' संस्थेनेही सहभाग नोंदवला. या कार्यशाळेत विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि पर्यावरणप्रेमी भक्तांनी हजेरी लावली. सेवानिवृत्त कलाध्यापक संजय गुरव यांनी अत्यंत सोप्या






आणि गमतीदार पद्धतीने काही मिनिटांतच गणेशमूर्ती कशी तयार करावी, याचे प्रात्यक्षिक उपस्थितांना दाखवले.

सहकार्य व नियोजन: हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी लायन्स क्लब खामगाव संस्कृतीचे अध्यक्ष नरेश चोपडा, दिव्या अभय अग्रवाल, प्रकल्प प्रमुख प्रसाद टिकार, वीरेंद्र शाह, गोविंद चुडीवाले, सुरज एम. अग्रवाल,राजकुमार गोयनका, उज्वल गोयनका व डिंपल शाह यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच वर्ल्ड फॉर नेचर संस्थेचे गणेश कोकाटे, मनोज सुळयेकार, संतोष डवले, मंगला गुरव, राजेश शर्मा, प्रवीण जमदाडे यांनी मूर्ती बनवताना विद्यार्थ्यर्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. नॅशनल हायस्कूलचे उपप्राचार्य हेरंब दिगंबर, पर्यवेक्षक प्रवीण क्षीरसागर आणि कलाध्यापक रूपाली वानखडे यांचे या शिस्तबद्ध प्रशिक्षणासाठी विशेष सहकार्य लाभले.







# राजेश्वरोत्सव







## ‘आरआरसीच्या 25 वर्षांच्या वाटचालीचा अभिमान’- संजना गवळी



प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात शिवसेना विदर्भ संपर्क प्रमुख संजना ताई गवळी यांचे आरआरसीच्या मंचावर आगमन झाले. यावेळी त्यांनी आरआरसी न्यूज नेटवर्कच्या २५ वर्षांच्या वाटचालीबद्दल गौरवोद्गार काढत “आरआरसीच्या या प्रदीर्घ प्रवासाचा आम्हाला अभिमान वाटतो,” असे सांगितले.

गेल्या २५ वर्षांपासून आरआरसीने पत्रकारितेच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, या प्रवासात आरआरसीने सातत्याने जनतेचा आवाज मांडण्याचे काम केले असल्याचे त्यांनी नमूद केले. कावड महोत्सवाच्या निमित्ताने आरआरसीच्या मंचावर उपस्थित राहण्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला.

## ‘पालखी उत्सवाची परंपरा कायमस्वरूपी सुरु राहील- राजेश भारती



प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात पालखी समूहाचे अध्यक्ष राजेश भारती यांचे आरआरसीच्या मंचावर आगमन झाले. यावेळी त्यांनी पालखी उत्सवाच्या प्रदीर्घ परंपरेचा उल्लेख करत उत्सवाला यंदा ८४ वर्षे पूर्ण झाल्याचे अधोरेखित केले.राजेश भारती म्हणाले की, पालखी उत्सवाची ही परंपरा गेल्या ८४ वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे. भाविकांच्या श्रद्धा आणि सहभागामुळे या उत्सवाला सातत्याने बळ मिळत आहे. आ. संतोष बांगर यांना आणण्यात राजेश भारती यांचा मोठा वाटा होता.

## अकोला पोलीस दलातर्फे आरआरसीला 25 वर्षांच्या वाटचालीस शुभेच्छा

प्रतिनिधी ८ सप्टेंबर



**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमादरम्यान खदान पोलीस स्टेशनचे ठाणेदार मनोज केदारे यांनी आरआरसीच्या मंचाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी आरआरसी न्यूज नेटवर्कच्या २५ वर्षांच्या वाटचालीबद्दल अकोला पोलीस दलाच्या वतीने शुभेच्छा दिल्या. मनोज केदारे यांनी आरआरसीच्या मंचावरून उपस्थितांना संबोधित करताना आरआरसीने गेल्या २५ वर्षांत पत्रकारितेच्या क्षेत्रात केलेल्या कार्याचा उल्लेख केला. “आरआरसीच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीबद्दल संपूर्ण अकोला पोलीस दलाच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा,” असे त्यांनी यावेळी सांगितले.

## ‘आरआरसी’ सत्यच दाखवते- पवित्रकार



प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कावड यात्रेला भेट देताना नगरसेवक आशिष पवित्रकार यांनी आरआरसीच्या मंचावरून उपस्थित जनतेला संबोधित केले. यावेळी त्यांनी ‘आरआरसी जे दाखवते, ते सत्य दाखवते’ असे म्हणत आरआरसी न्यूज नेटवर्कच्या कार्याचे कौतुक केले.

आरआरसी न्यूज नेटवर्कला नुकतीच २५ वर्षे पूर्ण झाली असून, ‘ज्याप्रमाणे आरआरसीने २५ वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केला आहे, त्याचप्रमाणे लवकरच १०० वर्षे पूर्ण होतील, असा विश्वास आशिष पवित्रकार यांनी व्यक्त केला. कावड यात्रेच्या निमित्ताने आरआरसीच्या मंचावरून ते बोलत होते.

## आमच्या राजकारणाची सुरुवात आरआरसीमधूनच-साबळे

प्रतिनिधी ८ सप्टेंबर



**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांचे आरआरसीच्या मंचावर आगमन झाले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाच्या सुरुवातीच्या आठवणींना उजाळा देत आरआरसी न्यूज नेटवर्कच्या कार्याचे कौतुक केले. “आमच्या राजकारणाची सुरुवात येथूनच झाली. विद्यार्थी सेनेत असताना बंडूभाऊ देशमुख यांनी आरआरसीच्या माध्यमातून आम्हाला व्यासपीठ उपलब्ध करून दिले,” असे पंकज साबळे यांनी सांगितले. “आम्हाला राजकारणात येऊन २५ वर्षे झाली आहेत आणि आरआरसीलाही २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. हा आमच्यासाठी खू प अभिमानाचा क्षण आहे.



गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लि. अकोलाचे अध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे यांनी सोमवारी दुपारी आरआरसीला भेट दिली. मंचावर आरआरसीचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले. चितलांगे यांनी आरआरसीच्या रौप्य महोत्सवी वाटचालीला शुभेच्छा दिल्या.

## चिमुकल्या बालगोपालांची नृत्यातून ‘शिवआराधना’!

### आरआरसी नेटवर्कने दिले व्यासपीठ उपलब्ध करून







अकोला : अकोला नगरीचा लोकोत्सव असलेल्या श्री राजराजेश्वर कावड व पालखी उत्सवानिमित्त आरआरसी नेटवर्कच्यावतीने कावड व पालखी मंडळाचे स्वागत करण्यासाठी भव्य स्टेज उभारला होता. यावेळी राजकारणातील दिग्गज व्यक्तिमत्वासह शहरातील गणमान्य नागरिक, कावडधारी यांनी विशेष उपस्थिती दर्शविली. या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत आरआरसी नेटवर्कच्या वतीने करण्यात आले. यावेळी विशेष आकर्षण ठरले ते बालगोपालांची शिवआराधना नृत्य. अनेक चिमुकल्यांनी पारंपरिक वेशभूषेत येत उत्कृष्ट असा नृत्याविष्कार केला. त्यांच्या नृत्याच्या विविध भावमुद्रा टिपण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. अनेक शिवभक्तांनी हे नृत्य कॅमेराबद्ध केले. यावेळी या चिमुकल्या शिवभक्तांनाही आरआरसीने व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षावर होत आहे.



विशेष म्हणजे या चिमुकल्यांचा हा नृत्याविष्कार कावड यात्रेत सहभागी सर्वांनी अनुभव असला तरी ‘आरआरसी लाइव्ह’च्या माध्यमातून शहरातील हजारो नागरिकांनी हा आनंद घरबसल्या लुटला. या शिवआराधना नृत्यात उन्नती शिरसाट, अनुजा जामनिक, स्वरा भातुलकर,आशय निशाराव आदी चिमुकल्या बालगोपालांनी सहभाग घेतला होता.

राजेश्वरोत्सव





## मान्यवरांच्या भेटी









हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135